# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| **मासिकाचे नाव** | **:** | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| **संस्थापक** | **:** | **गुंडोपंत, हरिभक्त** |
| **संपादक** | **:** | **डॉ. विजय वा. बेडेकर** |
| **प्रकाशक** | **:** | **अनंत विनायक धोरे** |
| **प्रकाशन वर्ष** | **:** | **२०१८** |
| **वर्ष** | **:** | **त्रेपन्नावे** |
| **अंक** | **:** | **पहिला** |
| **पृष्ठे** | **:** | **३२ पृष्ठे** |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१८**

**गणपत्रिका क्रमांक : १९५**

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : त्रेपन्नावे अंक : पहिला चैत्र/वैशाख शके १९४० एप्रिल २०१८

## *संपादकीय*

### धर्मरक्षण गरज, आणि धोका

सध्या मुक्त अर्थव्यवस्थेचे दिवस आहेत. या व्यवस्थेमध्ये बाजारपेठेमधील स्पर्धेला महत्त्व असते. आपल्या वस्तूला किंवा विचाराला विकण्याकरता खऱ्याखोट्या उपायांनी सजवा-धजवायला लागते. पण हे सगळेच अल्पजीवि असते. दुर्दैवाने धर्मासारख्या मूलगामी विचाराच्या संदर्भातही अलिकडे अशाच गोष्टी होताना दिसतात. म्हणूनच त्यांचा गांभीर्याने विचार करायला हवा.

आपला धर्म हा कमीत कमी पाच हजार वर्ष जुना आहे. आपल्या विचारप्रक्रियेचे उगम ज्यामध्ये आहेत ते वेद ज्या भाषेमध्ये लिहिले गेले आहेत त्याचे व्याकरण आणि ती भाषाही आज आपल्याला संपूर्णपणे अवगत नाही.

सहाजिकच त्यामुळे काळामधले हे अंतर नक्कीच हजारो वर्षाचे असणार. पाणिनीने संस्कार केलेली ती संस्कृत भाषा. स्वतः पाणिनी आपल्या पूर्वीच्या व्याकरणकर्त्यांचा उल्लेख करतो. यावर आज प्रचंड संशोधनात्मक साहित्यही उपलब्ध आहे. हे येथे सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, आपल्या धर्म संकल्पना व त्याच्याशी निगडीत असलेल्या दैवतशास्त्रापासून ते पूजेअर्चेपर्यंत त्याचा झालेला विकास हा हजारो वर्षांचा आहे. म्हणूनच इतर धर्मांना आहे तसा हिंदू धर्माला एक संस्थापक नाही. त्याचा एक धर्मग्रंथ नाही. एवढेच नाही तर दैवतशास्त्रांवरती ज्यांचा विश्वास नाही असेही लोक या व्यवस्थेचे घटक असतात. इतर धर्मांमध्ये 'प्रेषित' व 'धर्मग्रंथ' यांच्या परिघामध्ये राहू न इच्छिणारे लोक धर्मबाह्य होतात. हिंदू धर्मामध्ये असे होत नाही. हिंदू विचाराच्या सर्वसमावेशक व उदारमतवादाचे यापेक्षा दुसरे चांगले उदाहरण आणखीन काय पाहिजे?

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१. इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने कार्यालय बंद आहे. कृपया टपाल व मनीऑर्डर्स पाठवू नये.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.) दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता).५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

*श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५/९०८२९९०४३१ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), काभे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् । | ५ |
| गीतकृष्णायन-भाग ५- कुरूक्षेत्र | ६ |
| श्रीरामदासस्वामीसमर्थांचे दासबोधातील व्यवस्थापन | ९ |
| हे सम्पूर्ण विश्व भगवान श्रीकृष्णांकरिता एक प्रकारची दुरदर्शन वरील धारावाहिकाचं आहे | २० |
| देवालयांचे प्रकार | २३ |
| कौटिलीय अर्थशास्त्रातील शिक्षण-विषयक संदर्भ | २४ |
| श्रीकृष्ण स्तवन - जन्माष्टमी | २७ |


**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | |
|---|---|
| १) सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) उपासना | रु. ४० |
| ११) श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) गंगालहरी | रु. २५ |
| १४) गणपत्यथर्वशीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |

**जानेवारी ते मार्च २०१८**

**दीर्घकालीन सभासद (दी. का.) रु.१०००/-**

श्री. वसंत विठ्ठल कमलाकर, कोल्हापूर
श्री. केशव दत्तात्रय भावे, कोल्हापूर
श्री. आनंद भिकाजी इनामदार, कोल्हापूर
श्री. विनायक मिलिंद देसाई, कोल्हापूर
शिवाजी ग्रंथालय, शिरगांव, चिपळूण
श्री. गंगाराम कदम, पिंपळी, रत्नागिरी
खेर्डी वाचनालय, खेर्डी, चिपळूण
श्रीराम वाचनालय, मोरवणे, चिपळूण

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ३४ वा

**अंगुष्ठोदकमात्रेण शर्फरी फर्फरायते।।**[३८७]

अर्ध्या हळकुंडाने पिवळा होतो. पहिली ओळ : अगाधजलसञ्चारी गर्वं नायाति रोहितः।

दुसरी ओळ : अंगुष्ठोदकमात्रेण शर्फरी फर्फरायते।

मोठा मासा अथांग पाण्यात पोहत असतो. पण गर्व करीत नाही. पण सामान्य मासळी उथळ पाण्यात गिरक्या घेत असते.

**देवो न जानाति कुतो मनुष्यः?**[३८८]

देवाला पण माहित नाही तर माणसाला कोठून?

**अश्वप्लुतं, वासवगर्जितंच स्त्रीणां चित्तम्।**

पुरुषस्य भाग्यं, अवर्षणं चातिवर्षणा देवो न जाना ति कुतो मनुष्यः।

१) घोड्याची उडी २) धनिष्ठा नक्षत्रात होणारा ढगांचा गडगडाट ३) स्त्रीयांचे मन ४) पुरुषाचे भाग्य ५) दुष्काळ व ६) अतिवृष्टी ह्याबद्दल कोणीच निश्चित मत- देऊ शकणार नाही.

**मिष्टान्नम इतरेजनाः।**[३८९]

सामान्यजनांनो परमर्थातात स्वारस्य नसते.

**कन्या वरयते रुपं, माता वित्तं पिता श्रुतम्।**
**बान्धवः कुलम् इच्छन्ति, मिष्टान्नम् इतरेजनाः।।**

मुलगी वराच रुप पाहते, आई त्याच्या सांपत्तिक परिस्थितीचा विचार करते, वडिल शिक्षण, नातेवाईक- त्याच्या घराण्याचा विचार करतात. पण सर्वसामान्य लोक लग्नात पक्वान्न कोणते होते यालाच महत्त्व देतात.

**सज्जनमैत्री विपरीतानां च विपरीता**[३९०]

सज्जन सर्वांशी चांगले असतात पण ठकाशी ठकच असतात.

**इक्षोरग्रात्क्रमशः पर्वणि पर्वणि यथा। रसविशेषः**

**तद्वत्सज्जनमैत्री विपरीतानां च विपरीता।।**

उसाच्या कांड्या कांड्यात रस - विशेष असतो. त्याप्रमाणे सज्जनांची मैत्री ठकास ठक अशी असते.

**संपदो महतामेव, महतामेव चापदः।**[३९१]

ज्याप्रमाणे मोठ्यांना संपदा असते. त्याचप्रमाणे संकटेही असतात.

**वर्धते क्षीयते चन्द्रो न तु तारागणो क्वचित्।।**

क्षय आणि वृद्धी चन्द्रालाच होते ताऱ्यांना होत नाही.

**कण्ठचामीकरन्यायः।**[३९२]

काखेत कळसा अन् गावाला वळसा.

(पृष्ठ १९ वर)

# ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् ।

दि. दा. औटी

लेख १२ वा

**घुश्मेशं च शिवालये।**
**इलापुरे रम्यविशालके ऽस्मिन्**
**समुल्लसन्तं च जगद्वरेण्यम्।**
**वन्दे महोदारतरस्वभावं**
**घृष्णेश्वराख्यं शरणं प्रपद्ये।।**

अन्वय : अस्मिन् रम्यविशालके इलापुरे समुल्लसन्तं जगद्वरेण्यं महोदारतरस्वभावं – धृष्णेश्वराख्यम् (अहं) वन्दे। शरणं प्रपद्ये च।

समास – रम्यं च एतत् विशालकं च क.धा. रम्य आणि विशाल. रम्यविशालकं तस्मिन्।

जगद्वरेण्यम् – जगता वरेण्यः – तृ.त. जगाने विनविण्यास योग्य। जगद्वरेण्यः तम्।

महोदारतरस्वभावं – महान् उदारतरः स्वभावः यस्य सः बहु.। तग

घृष्णेश्वराख्यम् – घृष्णेश्वरः इति आरव्यायस्य सः। बहु तम्। घृष्णेश्वर नावाच्या

समुल्लसन्तम् – सम्+उत्+लस १ प.प. कर्तरि व.का.घा.वि. विराजमान असलेला.

टीप : वन्द १ आ. प. हे क्रियापद वंदन। नमस्कार या अर्थी योजले आहे म्हणून द्वितीया सर्वत्र.

भाषांतर – ह्या रम्य आणि विशाल अशा वेरुळ नगरीत शिवालयात विराजमान असलेल्या जगाने आराधना करण्यास योग्य अशा, अत्यंत उदार स्वभाव असलेल्या घृष्णेश्वर नावाच्या (देवाला) मी शरण आलो आहे आणि त्याचे मी वंदन करतो.

वृत्त – उपजाति – एकादशाक्षरा वृत्ति.
पहिले दोन पाद उपेन्द्रवज्राचे (उ उ)
दुसरे दोन पाद इन्द्रवज्राचे (इ इ)
उपजाति वृत्ताचे १४ प्रकार आहेत पैकी प्रस्तुत श्लोक उउइइ ह्या प्रकारचा आहे. अर्धसमवृत्त. यति ५ आणि पादान्त.

औरंगाबादच्या पश्चिमेस सुमारे तीस किलोमिटर अंतरावर वेरुळ गावाजवळ शिवालय नावाच्या पवित्र तीर्थावर घृष्णेश्वर हे दिव्य ज्योतिर्लिंग आहे. वेरुळ येथे प्रसिद्ध कैलास, लेणी आहेत. अहिल्याबाई होळकर यांनी ह्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. मंदिराच्या उंचीचा अर्धा भाग लाल पाषाणाचा असून वरील भागात दशावतार आणि अनेक देवतांच्या सुरेख मूर्ती आहेत. सभामंडप २४ दगडी खांबावर उभारलेला असून त्यावर सुंदर नक्षी कोरलेल्या आहेत. सभामंडपात भव्य, नंदिकेश्वर आहे.

येथे १२ ज्योतिर्लिंगाची लेखमाला पूर्ण झाली. 'द्वादशज्योतिर्लिङ्गाचे संक्षिप्त स्तोत्र नित्य पठणात असावे. त्याची सुरुवात ''सौराष्ट्रे सोमनाथं च याने होते व शेवटी घुश्मेशं च शिवालये'' असते. हे स्तोत्र बहुतेक धार्मिक पुस्तकात असते.

**ॐ नमः शिवाय।**

टीप : उच्चार करताना विसर्गाचा भारयुक्त उच्चार करावा. उदा. कः पदार्थ प्रातः काल. विसर्गाच्या पुढे कठोर वर्ण आला की असाच उच्चार करावा. इति शिवम्।

**– दि. दा. औटी**

प्रसाद औटी

'अर्जुन मोहनिरसन' – वृत्त शालिनी

युद्ध क्षेत्री कृष्ण पार्था म्हणाला
कल्पांतीही ना त्यजी या रणाला
मृत्यूसंगे होतसे स्वर्गप्राप्ती
वा जिंकोनी वाढवी क्षात्र कीर्ती ।।१।।

जन्मा आले सर्व सांडोनी गेले
पुन्हा जीवी प्राप्त देहांस केले
आप्तांच्या ह्या व्यर्थ शोकास त्यागी
झुंजावे ठेवोनि वृत्ती विरागी ।।२ ।।

पापी तोची नीज धर्मा चुके तो
कर्मत्यागे काय संतोष होतो
होता द्वारे प्रकृती सर्व कर्मे
आयुष्याचा अंत व्हावा स्वधर्मे ।।३।।

निष्पापा रे सोडुनी तू ममत्वा
सातत्याने चिंतसी आत्मतत्वा
योगी व्हावे चित्त वृत्ती निरोधी
ऐसे क्षेत्री कृष्ण पार्थासि बोधी ।।४।।

अर्जुन भर कुरूक्षेत्रावर अवतरलेली ती अमृतधारा चातकाच्या आतुरतेनं प्राशन करत होता. योग्य तिथे शंकानिरसन करून घेत होता. श्रीकृष्ण त्याच्या प्रत्येक परिप्रश्नाचं योग्य समाधान करून आपल्या लाडक्याचे कोड पुरवत होता. संभाषणाच्या ओघात अर्जुनानं विचारलं, कृष्णा, आत्ताच तू म्हणालास की हा योग तू यापूर्वी फक्त विवस्वानाला सांगितलाहेस. पण विवस्वान तर फार पूर्वीच होऊन गेला नाही काय? आणि तुझा जन्म तर कालपरवाचा... मथुरा नगरीतला...

यावर हसून श्रीकृष्ण म्हणाला, अर्जुना, तुझे आणि माझे यापूर्वी अनेक जन्म झाले आहेत. तू मोहानं ग्रस्त असल्यानं तुला ते आठवत नाहीत. पण मी मोहग्रस्त नसल्यानं स्वतःचं शुद्ध स्वरूप जाणून आहे. अरे, मी अनादी कालापासून आहे आणि अनंत कालपर्यंत रहाणार आहे. मला करण्यासारखं असं कोणतही कर्म उरलेलं नाही. तरिही मी धर्मसंस्थापनार्थ, सर्वभूतहितार्थ आणि 'जगावं कसं' हे सर्वांना सोदाहरण दाखवून दयायला वेळोवेळी माझ्याच प्रकृतीचा म्हणजे उपाधीचा आश्रय घेऊन जन्म घेत असतो. कधी राम बनून तर कधी कृष्ण म्हणून!

शहाणे लोक माझं अचिंत्य स्वरूप जाणतात तसंच ते माझ्या सूर्य, चंद्र, मन, हिमालय, कपिलमुनी, वज्र, सिंह, गरूड, श्रीराम, मार्गशीर्ष महिना, महर्षि व्यास इत्यादी विभूतीही जाणतात. जिथे म्हणून दिव्यत्वाची तुला प्रचिती येईल तो माझाच आविष्कार आहे असं तू समज. किंबहुना इंद्रियगोचर असं सारंच विश्व मी माझ्या केवळ एकाच अंशानं व्यापून राहिलोय म्हणेनास!

मी सर्वभक्षक काल असून माझ्या विश्वयंत्रणेतला तू एक घटकमात्र आहेस. तेव्हा तू केवळ निमित्तमात्र होऊन मी तुझ्यासाठी नेमून दिलेलं कर्म सारा भार माझ्यावर सोडून

आणि सर्वभावे मलाच शरण येऊन शांतचित्तानं कर! मी तुला सर्व प्रकारच्या पापांपासून मुक्त करीन आणि प्रत्यक्ष माझ्या हृदयात कायमचं स्थान देईन! अपरिमित आणि अक्षय आनंदघन अशा माझ्या स्वरूपात सर्वकाळ मी तुला सामावून घेईन!

अर्जुन हात जोडून म्हणाला, हे भगवन्, आपण आपल्या रूपाचं जे वर्णन करताहात ते मला प्रत्यक्ष दाखवावं अशी मी आपल्याला विनंती करतो. ते एकदा अपरोक्ष पाहिल्यावर माझ्या सर्व शंका आणि संशयाचं निरसन होईल अशी माझी मनोधारणा आहे.

पाडसानं दुग्धप्राशनासाठी मारलेल्या प्रेमळ ढुशांमुळे अधिकाधिक पान्हावणाऱ्या गोमातेप्रमाणं भगवान म्हणाले, पार्था, माझं विश्वरूप हे इंद्रियातीत असल्यानं तुला ते साध्या चक्षुंनी पाहता येणार नाही. म्हणून विश्वरूपात तुझ्यासमोर प्रकट होण्यापूर्वी मी तुला दिव्यदृष्टी प्रदान करतोय.

असं म्हणून त्या करुणाघनानं पार्थाला दिव्य दृष्टी दिली आणि आपलं विश्वरूप प्रकट केलं...

**'विश्वरूप' – वृत्त देवराज**

राम मी रहीम मीच
दैत्य पूर्णवध्य मी
मी अनादि मी अनंत
एक सृष्टिमध्य मी ।।१।।

मर्त्य मी अमर्त्य मीच
शंख चक्र पद्म मी
द्वैत मी अद्वैत मीच
काम क्रोध लोभ मी ।।२।।

अंबरीश मी धराच
आप तेज वायू मी
पाप मी व पुण्य मीच
गण्य मी नगण्य मी ।।३।।

गम्य मी अगम्य मीच
एक मात्र रम्य मी
व्यक्त मी अव्यक्त मीच
ईश आणि भक्त मी ।।४।।

हर्ष शोक मी प्रमोद
बद्ध जीव आस मी
मी लहान मी महान
जे उदार दान मी ।।५।।

मी विवेक मी विचार
भूतमात्र वास मी
ज्ञेय मीच मीच ज्ञान
सर्वजीव शान मी ।।६।।

मी अनन्य गेय मीच
लुत्फ आणि पेय मी
मीच मत्स्य आणि कूर्म
कर्म धर्म वर्म मी ।।७ ।।

चिंत्य मी अचिंत्य मीच
सर्वसाक्षि वंदय मी
ब्रह्म मी महेश मीच
एक विश्वनाथ मी ।।८।।

तर्क्य मी अतर्क्य मीच
सर्वसृष्टि अर्क मी

स्थूल आणि मीच सूक्ष्म
क्षात्र शूद्र वैश्य मी ।।९।।

आदय आत्मरूप मीच
सत्य शांत चित्त मी
एकमात्र सत्व मीच
अद्वितीय तत्व मी ।।१०।।

ते अतिविशाल, अवर्णनीय रूप पाहून अर्जुनाचं मन भयानं व्याकुळ झालं. दोन्ही हात जोडून भगवंतांना वारंवार नमस्कार करत तो म्हणाला, हे भगवन्, तुमचं खरं रूप न जाणता मी तुमच्याशी एखादया मित्रवत् वर्तन करत आलोय. माझं काही चुकलंमाकलं असेल तर उदार मनानं तुम्ही मला क्षमा करा आणि पुन्हा आपल्या मुकुट, चक्र, गदा आदी धारण केलेल्या मानवदेहधारी सौम्य रूपात फिरुन मला दर्शन दया.

या विनंतीचा स्वीकार करून भगवान पुनश्च श्रीकृष्ण रूपानं अर्जुनासमोर अवतीर्ण झाले. अर्जुनाला हायसं वाटून तो म्हणाला, कृष्णा, तुला पाहून माझं मन परत सावध आणि स्थिर झालंय. आता मला राजविदया, राजगुहय, योगशास्त्र पुन्हा एकदा संक्षेपानं आणि निश्चितपणानं सांग म्हणजे यापुढचं सारंच मार्गक्रमण मी निःशंकपणे करू शकेन!

अर्जुनाची सर्व हौस पुरवण्याचा चंग बांधलेला कृष्ण म्हणाला, मग ऐक तर...

जे इंद्रियगम्य विश्व आहे ते सर्व माझा केवळ अंशमात्र आहे. आपल्या विवेकबुद्धिनं तू माझी सत्यासत्य, सारासार, नित्यानित्य, क्षराक्षर, पुरुषप्रकृती, शिवशक्ती, ब्रह्ममाया ही दोन्ही रूपं जाणून हया द्वैतापलिकडचं परमात्मस्वरूप जाणून घे. ज्ञानयोग यालाच म्हणतात.

माझं स्वरूप असं जाणल्यावर तू मनोमनी सदैव त्या स्वरूपाचं स्मरण कर, चिंतन कर, मनन कर. हा झाला ध्यानयोग!

माझं असं अनुसंधान करत असताना प्रकृतिधर्मानुसार, तुझ्या शरिरधर्मानुसार, गुणधर्मानुसार, समाजधर्मानुसार सहजपणे प्राप्त झालेलं कर्मकर्तव्य जास्तीत जास्त भूतांच्या जास्तीत जास्त भल्यासाठी आपली ज्ञानेंद्रियं आणि कर्मेंद्रियं पणाला लावून करत जा. हा 'स्वधर्म' केल्यानं सकृद्दर्शनी तुला काही लाभालाभ झाला तरी अंती तुझं भलंच होणार आहे म्हणून त्याविषयी तू चिंताही करू नकोस अथवा त्याचा हव्यासही बाळगू नकोस. किंबहुना तुझ्या कर्माची फलं माझाच प्रसाद समजून सेवन कर. निष्काम कर्मयोग तो हाच!

अशा रितीनं मतीनं, मनानं आणि कायेनं प्रतिक्षणी सावधपणे, डोळसपणे जी उपासना केली जाते त्यालाच माझा सर्वश्रेष्ठ भक्तियोग म्हणतात. याचं फलस्वरूप म्हणून माझा भक्त मलाच येऊन मिळतो म्हणजेच अक्षय आणि अपरिमित आनंदाशी एकरूप होतो.

अज्ञानाचं निरसन करून अशा आनंदघनाशी तद्रूप होणं हे प्रत्येक जीवाचं अंतीम साध्य आहे. ते केवळ वरील मार्गाचा अवलंब केल्यानंच प्राप्त होतं. म्हणून तू सर्व धर्मांचा त्याग करून एक मलाच शरण ये.

(पृष्ठ १९ वर)

## श्रीरामदासस्वामीसमर्थांचे दासबोधातील व्यवस्थापन

वसंत गोडबोले

'व्यवस्थापन' म्हणजे मॅनेजमेंट या विषयाला सध्या अतिशय महत्त्व आले असून सर्वच स्तरावर वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय स्तरावर त्या विषयाचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर होत असून जीवनाच्या विविध अंगांसाठी ही व्यवस्थापन प्रणाली प्रयोगित करण्यात आली आहे. तसेच तिचा शास्त्रीय पद्धतीने विकासही झाला तर आहेच पण सदैव त्यात कालपरत्वे संशोधन करून त्याचे अद्ययावतीकरण होत आहे. उत्तम व्यवस्थापनाशिवाय उत्तम प्रगती होत नाही हे सर्व थरावर आता कळून आले आहे. सध्या आय एस ओ प्रणालीची चलती असून ती आंतरराष्ट्रीय स्तरावरची नामांकित प्रणाली आहे व तिचे प्रमाणपत्र ही प्रतिष्ठेची बाब आहे, त्यामुळे अनेक कंपन्या, संस्था, मंडळे या प्रणालीचे प्रमाणपत्र मिळवित असून तशी पराकाष्ठा अन्य कंपन्या, उद्योगसमूह, मंडळे करत आहेत व त्यासाठी पैसा व श्रम उपयोगात आणत आहेत. ही व्यवस्थापन संकल्पना तशी नवीन नाही. पूर्वीही होती, आजही आहे पण तिला शास्त्रीय स्वरुप नव्हते, तसेच तिचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, पुस्तके इ. इ. नव्हते. तरी पण त्या प्रणाल्यांमध्ये एक प्रकारची साधर्म्यता होती जरी तिचे प्रमाणिकरण झालेले नव्हते.

टाइम मॅनेजमेंट, फायनानशियल मॅनेजमेंट, सेफ्टी मॅनेजमेंट, बँकींग मॅनेजमेंट, एज्युकेशन मॅनेजमेंट, टेक्नीकल मॅनेजमेंट, हेल्थ मॅनेजमेंट, संरक्षण दल मॅनेजमेंट, पर्सनल मॅनेजमेंट, हॉटेल मॅनेजमेंट इ. इ. अनेकविध शाखा तसेच संगणक मॅनेजमेंट सारखे अत्याधुनिक मॅनेजमेंट विषय आज फॅक्टरी, कारखाने व संस्थामध्ये महत्वाचे आहेत. प्रत्यही नवीन क्षितीजेही विस्तारली जात असून व्यवस्थापन हा एक अत्यंत महत्वाचा आव्हानात्मक घटक वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आहे.

या व्यवस्थापन प्रणाल्या वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असल्या तरी त्यात एक सामान्य तत्व आहे. ते म्हणजे व्यक्ति, पैसा व गुणवत्ता या तीन प्रमुख घटकांबरोबर साधनसामुग्री व विश्वासार्हता यांचे उत्तम नियोजन करणे. हे जेथे जमते तेथे यश हमखास असते.

भारतात पूर्वी वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळे राजे होते व त्यांचे व्यवस्थापन हे त्या वेळच्या राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीप्रमाणे विभिन्न असे. आजच्या सारखे ते सर्व जीवनव्यापी नसून वैयक्तिक लालसा महत्वाकांक्षा यांचेशी निगडीत असे व त्यावेळची साधनसंपत्ती यावर अवलंबून असे. आज विज्ञाननिष्ठ युगात ही व्यवस्थापनप्रणाली धर्म जाती इ. भेदांना गौण वा नगण्य स्थान देणारी आहे.

श्रीरामदासस्वामी समर्थ हे अत्यंत उच्च कोटीतील लोकांतात असलेले संत होते. त्यांचा समाज व राष्ट्र व धर्म याबद्दलचा अभ्यास

अत्युच्च श्रेणीतील असून दासबोध या त्यांच्या ग्रंथात त्याचा प्रत्यय येतो. जीवनाचे सर्व स्तरावरील निरीक्षण तसेच, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीचेही केलेले व त्यावर सांगितलेले उपदेशाचे ज्ञान वाचल्यावर मन थक्क होते. आज जे व्यवस्थापन शास्त्र आम्ही उदोउदो करीत आहोत त्यातले कितीतरी संदर्भ दासबोधात आहेत. काळाप्रमाणे संदर्भ /व्याख्या/संबोधने बदलली, परिस्थिती, साधनसंपत्ती बदलली तरी कालातीत मूलतत्त्वे तशीच राहतात हे लक्षात ठेवावे. कापसावर वा सोन्यावर वेगवेगळे संस्करण/ प्रयोग करून वेगवेगळ्या वस्तू, वस्त्रे, दागिने बनविले तरी मूलतत्त्व कापूस वा सोने अस्त पावत नाही, तसेच.

या वरील अल्प/संक्षिप्त प्रास्ताविकानंतर दासबोधातील व्यवस्थापन याकडे वळतो. या लेखात मी फक्त आर्थिक, व्यक्तिगत, संस्थाप्रमुखपद व सामाजिक एवढेच विषय विचारात घेत आहे. तसेच ओझरता संदर्भ राजकीय व संरक्षण क्षेत्रासाठी करणार आहे. सर्व विषयांवर लिहिणे म्हणजे एक ग्रंथनिर्मिती करणे होय. या लेखाचा उद्देश दासबोधातील व्यवस्थापन वाचकांचे नजरेस आणून देऊन त्यांना त्याकडे अधिक ज्ञानार्थ प्रवृत्त करणे एवढाच आहे. दासबोध हा ग्रंथ खरोखरच एका अर्थाने व्यवस्थापनावरील ग्रंथ ही म्हणता येईल. या दृष्टीकोनातून पाहिल्यास श्रीसमर्थ रामदासस्वामी हे 'आद्य व्यवस्थापन गुरु' (Original Management Guru) म्हणावे लागतील हेच खरे.

समर्थ रामदास स्वामी त्यांचे तत्त्वज्ञान व त्याची मांडणी अशा पद्धतीने लिहितात की त्यातूनच उन्नत उत्तम व्यवस्थापनयुक्त आयुष्याकडे नेण्याचा त्यांचा दृष्टीकोन स्पष्ट होतो व या विचारधारेतच आधुनिक व्यवस्थापन शास्त्राची ठळक पदचिन्हे सापडतात. व्यक्तिमत्व विकासाला आज महत्त्व दिले जाते कारण व्यक्तीतून समाज व समाजातून राष्ट्र होते म्हणून. ही व्यक्तिमत्त्व विकास प्रणाली समर्थांचे साहित्यात पूर्णपणे आहे. प्रथम आपण व्यक्तिमत्त्व विकास व व्यवस्थापन बघू.

आधुनिक व्यवस्थापन शास्त्र व्यक्तिमत्व विकासात प्रथम स्वमनातील दोष निर्मूलन नंतर स्वगुणाचा (स्वतःतील गुणांचा) शोध घेऊन त्यांचे वृद्धींगतीकरण व आवश्यक असलेले नवीन गुण ग्रहण करून त्यांची जोपासना या तीन गोष्टीद्वारे आत्मविश्वास, क्षमतावर्धन करून नेतृत्व व सर्वसमावेशक सामाजिक सहजीवन यासाठी स्वतःस तयार करतानाच वर्तनशास्त्र (Behaviour Science) संवादशास्त्र (Communication Skill) यातील सूक्ष्मांचे / बारकाव्यांचे अंगीकरण करून व्यक्तित्व विकसन यांचे उद्दिष्ट साध्य करते (Personality Development Management). दोष निष्कासन, स्वगुण वर्धन, नूतन गुणारोपण या आधुनिक व्यवस्थापन शास्त्राच्या व्यक्तिगत विकास पायऱ्या समर्थ मार्गदर्शनात स्पष्टपणे दिसतात.

स्वतःचे दोष शोधण्यासाठी समर्थ

सांगतात, 'एकांती बसून चाळणा करावी' म्हणजे एकांतात बसून विवेक करत असता यत्नामध्ये कोठे खंड पडला ते कळते व एकांतात जो विवेक प्राप्त होतो त्याने यत्न कसे करायला हवे हे तर कळतेच पण प्राप्त विवेकानं मागे फिरुन बघायची गरज रहात नाही. म्हणजे स्वतःतील सकारात्मक क्षमता कळेल. समर्थ सांगतात की स्वक्षमता विकास करा व तो विकास कुठपर्यंत करायचा तर आळस व दैववाद यांच्यासारख्या प्रमुख दोषांसह अन्य दोषांवर मात करेपर्यंत. हा स्वसंघर्ष (उणीवा/ दोषांशी चाललेला संघर्ष) हीच व्यक्तिमत्व विकासाची चळवळ आहे. दशक १२ समास १ मध्ये ओवी क्र. १५, १६, १७ यातून त्यांनी हा विकास कसा करावा हे सांगितले आहे. हा समासच 'विमल लक्षण' यावर आहे. आधुनिक व्यवस्थापनशास्त्र केवळ बाह्य व व्यावहारिक अंगाने व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी दिसणे, प्रभावी बोलणे, बोलणे व दिसणे यासाठी सुसंगत चिंतन सहजीवनासाठी या ३ गुणांचे पूरकत्व, आत्मविश्वास, जीवनाबद्दल श्रद्धा व आस्था, उत्तम आस्वादन, प्रगल्भ अभिव्यक्तित्व, उत्तम नियोजन क्षमता, नेतृत्व, निरामय आरोग्य जोपासना हे गुण विचारात घेते, त्यामुळे त्यात मर्यादा येते व परिपूर्णतेसाठी 'चारित्र्य' हा गुण हवा असे त्या शास्त्राचे गुरुंना आता वाटू लागले आहे. ज्याचा सखोल अभ्यास व मार्गदर्शन समर्थांचे साहित्यात आहे. समर्थांनी व्यायाम प्रणालीचा प्रचार केला व निरोगी शरीर हवे ते याने मिळेल व त्यामुळेच मन निरोगी होईल. Healthy Mind in Healthy Body. शरीर उत्तम निरोगी हे व्यक्तिमत्त्व विकसनासाठी आवश्यक आहे. या व्यवस्थापनात समर्थांचा उद्देश स्पष्ट आहे. अन्नमय कोष विकसनासाठी व्यायाम, मनोमय कोणासाठी मनोबोध, दासबोध व ज्ञानमय कोषविकसनासाठी एकांतात विवेक व साधना देणाऱ्या सद्‌गुरुस शरण जाणे हे केवळ समर्थांनीच सांगितले आहे. आधुनिक व्यवस्थापनशास्त्रे हे सांगूच शकत नाहीत.

समर्थ रामदासस्वामींनी १२ वर्षे स्वाध्याय व १२ वर्षे भारत भ्रमणातून समाजाचा अभ्यास, निरीक्षण करून त्यांचे लक्षात आले की समाज स्वत्व विसर पडलेला, विघटीत व असुरक्षित आहे. आत्मभान त्यास राहिले नाही कारण प्रयत्न, प्रचिती व श्रम याची कास सुटलेली आहे व त्यासाठी सुशिक्षण आवश्यक आहे. म्हणून त्यांनी मठरुपी विद्यालये स्थापन केली. हे त्यांचे 'शिक्षण व्यवस्थापन' आधुनिक शिक्षणशास्त्रात Education is the transmission of knowledge for its utility अशी शिक्षणाची व्याख्या करतात. समर्थांनी त्यांच्या अनुभवाष्ठित ज्ञानाचा उपयोग सुसंघटीत समाजनिर्मितीसाठी केला. महंत घडविण्यासाठीही केला. त्यामुळे त्यांचा दासबोध हा ग्रंथ शिक्षणकोश वा Dictionary of Education आहे. शिक्षणप्रणालीत सामान्यतः तीन घटक येतात – आशय/अर्थ, शिक्षक व विद्यार्थी. या अनुषंगाने विचार करता समर्थांचे सर्व जीवनकार्य शिक्षणच होते व ते आजन्म शिक्षकच होते असे म्हणावे

लागेल. त्यांच्या काळी आतासारखी शाळा, शिक्षक, विद्यार्थी, शैक्षणिक साधने, शिक्षणखाते इ. इ. नव्हते. हल्ली शिक्षण व्यवस्थापन तीन प्रमुख तत्वावर आधारीत आहे. शिक्षणाची मूलग्राही नीति, सामाजिक समस्या व ते अडथळे दूर करणेची नीति व विकास नीति. तसेच मूलग्राही दृष्टीकोन हा सतत बदलत्या वातावरणाशी समरस करून त्यात सुयोग्य परिवर्तनाचा आहे का याचाही विचार करून तसा बनवला/बदलला जातो. बदलत्या सामाजिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शिक्षण प्रणालींचा अभ्यास करून दासबोधात व अन्य समर्थ वाङ्मयात हे शिक्षण व्यवस्थापन आहे. समर्थ रामदास हे आदर्शवादी, अध्यात्मवादी व व्यवहारवादी (Realistic) होते. त्यांच्या प्रणालीत 'ज्ञान' हा शब्द ऐहिक ज्ञान व अध्यात्म ज्ञान असा यथार्थ आहे. हे दोन्ही स्तरावरील ज्ञान परस्परपूरक असावे हा त्यांचा दृष्टिकोन. त्यांची ही दृष्टी वेगळी पण समृद्ध होती.

त्यांच्या शैक्षणिक व्यवस्थापन प्रणालीत शैक्षणिक उद्दिष्टे व ध्येय परिपूर्ती म्हणजे समाजप्रबोधन, आत्मविश्वास व आत्मभान निर्मिती, विकसनशीलत्व, तमोगुण, रजोगुण नाशन व सत्वगुण अंगीकरण यासाठी आत्मचिंतन व आत्मपरिवर्तन प्रयत्न हेच घटक होते.

समर्थांनी वाचन, लेखन व गणित या तीन मुद्यांसाठी एक समास लिहिला आहे. तो शैक्षणिक आशयासाठी. पण त्याचबरोबर श्रवण यावर पण त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. जीवनाची प्रत्येक बाब मग ती ऐहिक/भौतिक वा अध्यात्मिक असो ती उत्तमच हवी हा त्यांचा आग्रह आहे. ही दोन्ही शास्त्रे अभ्यासक्रमात हवीत हे त्यांना अभिप्रेत आहे पण यात त्यांचा आग्रह आहे तो भौतिक शास्त्राभ्यास हा अध्यात्मशास्त्राचा पूर्वाभ्यास हवा. लेखन, वाचन, बोलणे व श्रवण याबद्दल रामदास स्वामींनी दासबोधात लिहिले आहे.

शिक्षक यास Key of Education म्हटले जाते. विद्यार्थ्यांना आकार देण्याचे काम ते करतात. शिक्षक हा अत्यंत महत्वाचा घटक समर्थांनीही मानला आहे. दासबोधाच्या ५ व्या अध्यायात सद्गुरु लक्षण व महंत लक्षण त्यांनी सविस्तर दिली आहेत. शिक्षक हा सदैव विद्यार्थीही असावा हे त्यांचे मत मौलीक आहे. तसेच विद्यार्थीही कुशाग्रबुद्धी, चपळ, विश्वासू, कामसू, व्यापक व्यक्तिमत्वाचा हवा. ठोंब्या, जडबुद्धीचा नको. अशा विद्यार्थ्यास समर्थ 'म्हैस मंगळू' म्हणतात. विद्यार्थी सर्वमित्र, धीरवृत्ती, संयमी, शुद्धचारित्र्याचा हवा तसेच नम्र, संशोधक वृत्ती, तर्कशुद्ध विचारसरणीचा हवा.

समर्थाची शिक्षण व्यवस्थापन प्रणाली ही सूक्ष्म निरीक्षण, आनंद आधारीत, मानसशास्त्रीय, कृतीप्रधान / कृतीयुक्त, बालक केंद्रीत, अनुभवाधिष्ठित आहे. सर्व सुशिक्षित सूज्ञांनी अज्ञजनास शिकवावे. 'जे जे आपणास ठावे। ते ते दुसऱ्याशी द्यावे। शहाणे करून सोडावे। सकल जन।। याचबरोबर' मुलाच्या चालीने चालावे। मुलांच्या मनोगते बोलावे। तैसे जनांसी

शिकवावे। हळूहळू।। असे ते सांगतात.

या व्यवस्थापन प्रणालीत आणखी काही मुद्यांवर समर्थ भर देतात ते म्हणजे संवाद, पाठांतर, क्रीडन, संवाद (Communication) यात समर्थ गुरु शिष्य दोघांनीही परस्परांस प्रश्न विचारुन ज्ञानात भर घालावी सांगतात. शिष्याला प्रश्न विचारण्यास ते प्रोत्साहन देतात. यासाठी द. ६ स.६ ओ.२ व द.१७ स३ ओवी ४ वाचावी. पाठांतरावर समर्थांचा भर होता पण ते पाठांतर अर्थ समजून नसेल तर व्यर्थ – ''पाठांतर उदंडची असावे। सर्वकाळ उजळीत जावे। पण अर्थाशिवाय कासया असावे। व्यर्थ का मरावे घोकून।।' असे त्यांचे मत होते. 'कंटाळा दुरी करावा। मजामध्ये त्रासो नये। सांगता सांगता तसे। हासे खेळे अहर्निशी।।' या प्रमाणे त्यांनी विविध गाणी रचली, पोवाडे, सावी, सवया, डफगाणी अशा विविध शब्द योजनाद्वारे तसेच संगीत, कोडी, अभिनय व मर्मविनोद यांचा वापर करून क्रीडन (Play way Method) चा वापर शिक्षणात केला कारण समर्थ स्वयंप्रेरक, कल्पक व संशोधक वृत्तीचे शिक्षक होते.

Concept of Learning अध्ययन संकल्पनेतही ती शिक्षण व्यवस्थेचा गाभा आहे व ज्ञानप्राप्तीचा एकमेव मार्ग आहे. हे जाणून समर्थांनी तिचा विचार केला आहे. ज्ञान प्राप्ती करणे + ज्ञान अंगिकारणे + ज्ञान समजणे + ज्ञान स्पष्ट करणे या पायऱ्यांबरोबर विषय व व्यक्ति याबद्दल Attachment म्हणजे आत्मियता प्रतिबद्धता 'शिकले शब्द जे थोडे। जिव्हाळा पाहिजे बरा' अशी धारणा होती व अध्ययन संकल्पनेचे Verification पडताळणी त्यांना अभिप्रेत होती. 'घासामागे घास घेतला। अवकाश नाही चावायाला। अवघा बोकाणा मारला। पुढे कैसे।। तसेच शब्द रत्न परीक्षावी। प्रत्ययाची पाहोन घ्यावी। येर ती अवघी सांडावी। येकीकडे।।' यावरुन समर्थांची दृष्टी स्पष्ट होते. तसेच 'संदेहरहित ज्ञान। निश्चयाचे समाधान।।' ही त्यांची भूमिका होती.

समर्थांचे शिक्षण व्यवस्थापन प्रणालीत आणखी महत्वाचे घटक आहेत ते असे १) गुरु-शिष्य संबंध (Interaction) २) शिस्त ३) नीतिमूल्य शिक्षण ४) व्यक्तिगत मूल्य ५) सामाजिक मूल्य ६) अध्यात्मिक मूल्य ७) मानस शास्त्र ८) व्यक्तिमत्व ९) व्यक्तिमत्व भिन्नत्व १०) स्त्री शिक्षण ११) शारीरिक शिक्षण व आरोग्य १२) मूल्यमापन १३) आदर्श समाज १४) लोकशिक्षण

यावरुन श्रीसमर्थाची शिक्षण व्यवस्थापन प्रणाली किती प्रगत होती व सर्वांग परिपूर्ण होती ते कळते. साऱ्या जगात आलेली प्रबोधनाची लाट जी १८ व्या शतकात आली ती समर्थांनी १७ व्या शतकातच भारतात आणली व केवळ याच प्रणालीत शिक्षणाचा संकुचित अर्थ वाचन, लेखन आकडेमोड न ठेवता आपल्या आयुष्य व क्षमतेची मर्यादा (लक्ष्मणरेषा) लक्षात घेवून जे जे चिरंतन, अविनाशी त्याचा बोध घेणे म्हणजे शिक्षण असा व्यापक अर्थ आहे. चराचर सृष्टीचा विकास तसेच व्यक्तिविकास समर्थांना हवा

होता. समर्थांची शिक्षण व्यवस्थापन प्रणाली Scientific होती. कारण त्यात माहिती संकलन, निरीक्षण, परीक्षण, चालना, विवेचन, प्रयत्न, प्रचिती पुनःप्रचिती व सिद्धांत या वैज्ञानिक अष्टांगाचा समावेश होता. समाजाविरुद्ध जाऊन ठामपणे स्त्रीशिक्षण पुरस्कार व प्रचार करणारे समर्थ रामदास एकमेव संत नेता होत.

शिक्षण व्यवस्थापनावर बरेच लिहिता येईल पण तो वेगळा विषय ठरेल. आता अन्य व्यवस्थापनाकडे बघू या.

आर्थिक व्यवस्थापन (Financial Management) :- समर्थ रामदासांनी १२ वर्षे देशात भ्रमंती केली व त्यात भारतीय समाज जीवनाचे बारकाईने निरीक्षण केले होते. त्यात त्यांनी सामान्य माणसाची स्त्री-पुत्र-द्रव्य आसक्ती, संसारताप. कर्जबाजारीपणा, अन्नान्नदशा, मुलांकडून पत्नीकडून होणारी अवहेलना. जीवनात येणारे नैराश्य इ. इ. कारणांनी संसारांची दुरावस्था पाहिली होती. व हे सर्व दासबोधात लिहिले व त्यावर मात करण्यासाठी जो उपदेश केला ती प्रणाली म्हणजेच त्यांचे आर्थिक व्यवस्थापन. प्रपंच प्रथम, परमार्थ नंतर हा त्यांचा संदेश.

जे प्रापंचिक माणसाचे तेच उद्योग, समाज व राज्याचेही कारण हे तीनही घटक आर्थिक सुस्थितीत नसतील तर समाज व राष्ट्र डबघाईस जाते हे त्यांनी जाणून तसाही उपदेश वा मार्गदर्शन केले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने प्रपंच नेटका करून सुखी व्हावे. बलसंवर्धन करावे व स्वराज्य स्थापनेस उद्योग करून साह्यभूत व्हावे अशी त्यांची तर्कश्रृंखला आहे व हे सारे करून मगच त्याने परमार्थाकडे वळावे हे ठाम प्रतिपादन आहे. आर्थिक व्यवस्थापनात मनुष्य, मशीन, मनी, मेथड व मॅनेजमेंट हे घटक असतात. प्रथम समर्थांनी आर्थिक विपन्नता मनुष्यास का येते ते सांगितले आहे ते दासबोधाच्या तिसऱ्या दशकातील पहिल्या ३-४ समासात, माणसाचा विवाह वयात आल्यावर झाला की तो जन्मदात्यांना तुच्छ लेखू लागतो. इंग्रजीत "Son remains son, till he gets his wife, daughter remains daughter throughout her life" अशी म्हण याच अर्थी आहे. तरुणपणी पत्नी गेली की पुनर्विवाह, मग बाहेरख्यालीपणास लागून द्रव्यनाश, रोगांचा बळी, संतती न झाल्याने सामाजिक टीका व दैववादी बनून अनेक अपत्ये व विपन्न दशेला सुरुवात, बाजारात पत जाणे इ.इ. अनेक कारणे त्यांनी दशक ३ समास ४ व समास ५ मध्ये दिली आहेत. कौटुंबिक संख्या (सदस्यांची) वाढली की मिळणारे उत्पन्न व खाणारी तोंडे यांचे गणित चुकते व विपन्नदशा येते. तसेच अस्मानी सुलतानी संकटे येवून लोकसंख्या कमी होते हा ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ टॉमस् रॉबर्ट माल्थसचा लोकसंख्या सिद्धांतच त्यावेळी समर्थ रामदासांनी मांडला.

तसेच ९ व्या दशकात ४ थे समासात त्यांनी केलेली दारिद्र्यमिमांसा ही लक्षणीय आहे. जगात श्रीमंत व गरीब हे वर्ग आहेत. विद्या शिकून व्यवसाय/उद्योग करतात ते धनवान होतात, तर आळशी अवगुणी, अज्ञानी

जनांचे पदरी दारिद्र्यच येते. 'विद्या नाही बुद्धी नाही। विवेक नाही साक्षेप नाही। कुशलता नाही व्याप नाही। म्हणोनी प्राणी करंटा।। द.९ स.४, ओ.१० म्हणून समर्थ रामदास दशक १४ समास ६ व ओवी २६-२७ मध्ये कठोरपरिश्रम व व्यवसायव्याप्तीवर्धन. (आळस निर्मूलन करून व विद्या प्राप्त करून) हे मार्ग सांगितले आहे. 'जितुका व्याप तितके वैभव। वैभवासारीखा हावभाव। समजले पाहिजे उपाय। प्रगटचि आहे।। आळसे कार्यभाग नासतो। साक्षेपे होत होत होतो। दिसते गोष्टी कळेना तो। शाहाणा कैसा।।' यात हे स्पष्ट आहे.

समर्थांनी खोटा मोठ्या श्रीमंतीचा भपका/दिमाख मिरवणारे ''ऋणं कृत्वा घृतं पीबेत'' या वृत्तीचे आळशी खुशालचेंडू भपकेबाज दिवाळखोर यांचाही या व्यवस्थापनात विचार करून अशा भंपकांची दिवाळखोरांची फजिती/नाचक्की निश्चित आहे असे जनसामान्यांना सांगून सावध केले आहे. दशक १०, समास ८ ओवी १५ पहा.

परिश्रम करणे यास समर्थ महत्त्व देतात. कुटुंब नियोजन (मर्यादित कुटुंब समर्थांनी संततीनियमन त्यावेळी सांगितले आहे) तर हवेच पण कष्टाने अर्थार्जन व अर्थ विनियोग नियोजन हेच सुखी समाधानी राहणीमानाचे गमक सांगितले आहे. दशक ११ स. ३ ओ. २९ तसेच दशक ११ स.१० ओ.२० व दशक २२ स.९ ओ.१ यासाठी वाचावी. 'म्हणोनी आळस सोडावा। येत्न साक्षेपे जोडावा' असे परत समर्थ सांगतात. सुयोग्य आर्थिक नियोजनात आय व व्यय या दोन्ही गोष्टी विचारात घेतात व आगामी/भविष्यातील काळासाठी तरतूद करतात हे व्यावहारिक तत्वही समर्थ सांगतात - वायफळ खर्च नको. हल्ली जे तत्व Earn profit through right purchase at right time, at right cost, in right quantity, from right vendor, at right quality खरेदी प्रणालीसाठी वापरतात तेच समर्थांनी त्यावेळी वापरले जावे हे उपदेशीले आहे. द.१८ स.७ ओ. ७ वाचा. तसेच द.१७ स.३ ओ.४, द.१७ स.३ ओ.५ यापण पहाव्यात. रोख, चोख व्यवहार विवेक, साक्षेप, सावधानता व सततोद्योग व गुणवत्तेचे कठोर निकष लावून परिक्षण हे त्यांच्या आर्थिक व्यवस्थापनातले प्रमुख घटक आहेतच.

आर्थिक व्यवस्थापनात समर्थ रामदासांनी त्यावेळी सावधानतेचे महत्त्व विषद केले आहे.

समर्थ रामदास प्रामाणिकता व विश्वासार्हता हे हि गुण आर्थिक व्यवस्थापनाचे घटक मानतात. दशक १९ समास ९ ओवी९ पहा. (Quality, Honesty and Reliablility) हल्ली Quality Management बरोबरच Reliablility Engg हे शास्त्रहि उदय पावले आहे. गुणवत्ता व विश्वासार्हता हे गुण समर्थांनी त्यावेळी सांगितले आहेत. व्यवहारात (आर्थिक व्यवहारात) समर्थांनी निस्पृहलक्षणे सांगितली आहेत. दशक १४ समास १ ओवी २१ मध्ये ते व्यवहारातील पाळावयाची पथ्ये सांगतात. 'नेमी आंगी लावू नये।भरवसा

कोणास देऊ नये। अंगिकार करू नये। नेमस्तपणाचा।। यात ते कोणास जामीन राहू नये हा सल्ला देतात. तसेच व्यवहारदक्षतेसाठी आणखी एक पथ्य सांगतात. 'सोईरिकीत पडो नये। मध्यवर्ति घडो नये। प्रपंचाची जडो नये। उपाधी आंगी।। दशक १४ समास १ ओवी ५१. तसेच व्यवहार उधारीने करू नये. रोखीनेच करावा असे त्यांचे मार्गदर्शन आहे.

आर्थिक व्यवहार म्हणजे ताळेबंद जमाखर्चाचा. Book Keeping व Accountancy म्हणून उद्योग-व्यवसाय करतांना जमाखर्च ज्ञान आवश्यक आहे. याबाबतीत अज्ञानामुळे दुसऱ्यावर विसंबून राहिले तर सुरनीस (हिशेब तपासनीस) ठपका ठेवीलच. दशक १८ समास ५ ओवी १७ 'लिहिणे न येता व्यापार केला। काही येक दिवस चालला। पुसता सुरनीस भेटला। तेव्हा खोटे।।'

कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी ज्ञान त्या गोष्टीचे हवेच हा महत्त्वाचा घटक. त्यांचे आर्थिक व्यवस्थापनात आहे. अखंड उद्यमशीलता व बहुतांची अंतरे राखा हा त्यांच्या आर्थिक व्यवस्थापन प्रणालीचा संदेश आहे. एवढा सर्वांगीण विचार त्यांनी त्यावेळी केला होता, म्हणूनच आजही त्यांचे हे विचार उपयुक्त आहेत. आजचे आर्थिक घोटाळे, राष्ट्राची दिवाळखोरी, भ्रष्टाचार पहाता समर्थांची आर्थिक व्यवस्थापन व्यवस्था आदर्श वाटते हे खरे.

सामाजिक व्यवस्थापन :- समर्थ रामदासांचे वेळी मुस्लिम राज्यकर्त्यांचा प्रचण्ड अंमल होता व विशेषतः हिंदू धर्म व समाज त्याखाली भरडला जात होता. समर्थांनी भारतभ्रमणात समाजाची सुखदुःख व कमजोरी (कमकुवतपणा) व हिंदूची वाईट अवस्था होण्याची कारणे समजावून घेऊन नंतर महाराष्ट्रात येऊन ते आपले कर्मक्षेत्र निश्चित केले. मुसलमानी राज्यकर्त्यांचे ऐश्वर्य व प्रचण्ड सामर्थ्य यामुळे दिपून जाऊन हिंदू समाजातील दलित वर्ग मुसलमान बनला जात होता हे बरेचशे खरे असावे. जरी अनेक संतांनी हिंदू समाजाला धीर देऊन त्यांची हिंदू धर्म व जीवनपद्धतीवरची श्रद्धा व निष्ठा अबाधित ठेवण्याचे कार्य अतिशय बिकट परिस्थितीत समर्थपणे केले. तरी सर्व आश्रमांचा मूलाधार गृहस्थाश्रमाचे धर्माचरणातील अवनतीकडे त्यांचे तितकेसे लक्ष गेले नाही ते परिस्थिती दोषांनी होय. केवळ समर्थ रामदासांनीच आध्यात्मिक उन्नतीबरोबर सामाजिक व्यवस्थापन ज्यात त्यांनी धर्मरक्षण, समाजरक्षण व हिंदू धर्म व जीवन प्रणाली जतन याकडे आत्यंतिक प्रतिकूल परिस्थितीतही लक्ष देवून हिंदू समाजास चैतन्यमय, ज्वलंत दिग्विजयी राष्ट्र बनविण्यासाठी महाराष्ट्रव्यापी चळवळ उभी केली. या समाज व्यवस्थापनात त्यांनी समाज प्रबोधन व सामाजिक समस्या यावर भर दिला. दासबोधासारखा महान ग्रंथ व अन्य पद्यात्मक साहित्य विपुल विस्तृत प्रमाणात लिहिले. ज्याद्वारे प्रबोधन केले प्रपंच प्रथम व परमार्थ नंतर हे त्यांनी समाजप्रबोधनाचे प्रथम कर्तव्य मानले. 'यत्न तो देव जाणावा' याद्वारे अथक

प्रयत्नवाद व्यक्ती व समाजात रुजविला.

हिंदू समाजजीवन मंदीराभोवती गुंफलेले/गुंतलेले असते. मुसलमानी अंमलात त्यांनी मंदिरे व अन्य धार्मिक संस्था पद्धतशीरपणे नष्ट करून हा पायाच उखडण्याचा प्रयत्न केला व अशाप्रकारे त्यांची सामाजिक धारणा शक्ती नष्ट करून हिंदू समाज विस्कळीत व दुबळा बनविला व स्वतःच्या पीरांच्या कबरी गावोगावी उभारुन त्यांना ग्रामदैवत बनविले व त्यांची पूजा व उरुस यात हिंदू समाज मनोभावे रमू लागला. याला तोड म्हणून समर्थ रामदासांनी महाराष्ट्रभर प्रवास करुन गावोगावी मारुती या शक्तीदेवतेची मंदिरे व बलोपासनेसाठी आखाडे स्थापन केले. त्यामुळे समाज पुन्हा एकात्म होण्यासाठी यांचा फार उपयोग झाला व समाज बलोपासनेकडे वळला.

हे समाज व्यवस्थापनेचे पहिले तत्व वा पायरी होय. दुसरी पायरी होती सामाजिक मनातील भयगंड व न्यूनगंड घालविणे. मुसलमानी फौजांचे यशसातत्यामुळे हिंदू मनात आपण मुसलमानांना जिंकू शकत नाही हा भयगड व हिंदू राज्य कधीच येणार नाही हा न्यूनगंड निर्माण झाला होता. समर्थांनी लवकरच स्वराज्य येईल या आशेवर पुन्हा हिंदू संघटना उभी केली. अत्यंत कमी कालावधीत ११०० मठ स्थापून निरनिराळ्या जातींचे व लिंगांचे महंत नेमले. मठ कार्य व महंत कार्य यासाठी सविस्तर आचार प्रणाली केली, काटेकोर पालन यावर भर दिला.

समर्थांचे सामाजिक व्यवस्थापनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी संतांचे पारंपारिक कार्यक्षेत्राबाहेर जाऊन समाजाला वैयक्तिक जीवनात यशस्वी गृहस्थाश्रमाचे, धार्मिक जीवनात संघटित एकात्मतेचे व सामाजिक क्षेत्रात स्वराज्याचे महत्त्व देऊन कार्यप्रवण केले. ही चळवळ उभी केली व सांगितले की, 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जे करील तयाचे। परंतु तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।' त्यांच्या या व्यवस्थापनात जात, पात, वंश, लिंग, आर्थिक स्तर यांचा भेदभाव नव्हता.

त्यांच्या सामाजिक व्यवस्थापनात, रावापासून रंकापर्यंत, अडाणी, धनगर कुणबी ते महानपंडित, स्त्रिया, बाल, वृद्ध, सर्व जातपात यांचा समावेश होता. कारण त्यांनी या सर्वांची मने जिंकली होती. ती इतकी की त्यांचे शब्दाखातर ते प्रसंगी प्राणत्यागासही तयार होत. त्यांची शिस्त अत्यंत कडक होती. शिष्यांची परीक्षा पहात, धडा शिकवत व क्षमा करून प्रेमवर्षाव करीत. माणसे राजी राखणे ही त्यांच्या व्यवस्थापनांची गुणवत्ता होती. यात लोभाला व इर्षेला स्थान नव्हते.

सामाजिक व्यवस्थापनात लोकसंग्रह व लोक जागृतीस महत्त्व आहे म्हणून त्यांनी दासबोधात विवेक, वैराग्य, तरतम भाव अंगी कसा बाणवावा हे सांगितले आहे. त्यांचे सामाजिक व्यवस्थापनात तत्त्वज्ञानाची समतोलता आहे. अकारण आग्रह, वितंडवाद, कर्मठता व द्वेष / सूडबुद्धी नाही. व्यावहारिक तत्त्वज्ञान समाजास देणे हेच त्यांचे समाजव्यवस्थापन. या त्यांच्या व्यवस्थापनात

Integrated Development Plan होता (एकात्म विकासप्रणाली). समाज उन्नतीसाठी सामाजिक व्यवस्थान व त्याचे दोन स्तर- वैयक्तिक व संघटनात्मक हे ओळखूनच त्यांनी लोकशिक्षण व संघटन कार्य आखणी केली. सामाजिक क्रांती शिवाय हिंदू धर्म बळकट होणार नाही हे त्यांनी जाणले होते; व राजक्रांती शिवाय समाजक्रांती नाही म्हणून त्यांनी निर्भय समाज निर्मितीसाठी त्यागी उदात्त माणसे निर्मिती केली व त्यासाठी रामदासी संप्रदाय स्थापला. जुलमी राजवटीविरुद्ध जनजागृती केली जी स्वराज्यास उपयोगी पडली. समर्थांचे सर्व महंत मोठ्या योग्यतेचे, मोठा जनसंपर्क असलेले, राजकारण व समाजकारणात सक्रीय असत. हा सामाजिक व्यवस्थापनातील त्यांचा महत्त्वाचा घटक. त्यांनी भारतात ठिकठिकाणी मठ स्थापले, परंतु केवळ आध्यात्मिक प्रबोधन हे त्या महंत व शिष्यांचे कार्य नव्हते तर ते गुप्तहेर व निरोप्याचे कार्य अगदी बिनबोभाटपणे करीत. स्वराज्यस्थापनेत शिवरायांच्या अत्यंत प्रभावी गुप्तहेर यंत्रणेला या मठांनी मौलीक मदत केली. हे सर्व मठ त्या गुप्तहेरांचे आश्रयस्थान असत. लष्करात भरती होण्यास धडधाकट, शस्त्रसज्ज तरुणांची नितांत आवश्यकता असते व होती म्हणून त्यांनी व्यायामशाळा उभ्या करून शक्तीदैवत मारुती स्थापन केले व बलदंड शस्त्रपारंगत वीरवृत्तीचे, अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ती असलेले युवक निर्माण करून असे लढवय्ये वीर स्वराज्य स्थापनेस उपलबध करून दिले.

स्वराज्य स्थापनेच्या उत्तुंग कार्यासाठी लागणारी सामाजिक पार्श्वभूमी त्यांनी या त्यांच्या सामाजिक व्यवस्थापनातून केली. समाज उत्तम प्रकारे वीरवृत्तीचा, धार्मिक बनविला हे महान यश या सामाजिक व्यवस्थापनाचेच होय.

समर्थ रामदास स्वामींचे योगदान सर्व क्षेत्रात आहे व सर्व क्षेत्रांत त्यांचे व्यवस्थापनाचे कौशल्य उत्तुंग आहे. राजकारणातही त्यांनी राजकारभाराचे तसेच संरक्षण क्षेत्रात गडकोट बांधणी, गुप्तहेरपणा इ. जे मौलिक मार्गदर्शन केले आहे. सर्व क्षेत्रात हे प्रभावी मार्गदर्शक होते. ज्याला इंग्रजीत Mentor म्हणतात. त्यांचाजनसंपर्क सर्व समाजातील तळागाळापर्यंत होता व हिंदू धर्मातील सर्व जातीपाती धर्म संप्रदायामध्ये होता. लोकांच्या वैयक्तिक अडचणी सोडविण्यास मदत करणे व त्यांना संघटीत होण्यास मार्गदर्शन करणे हे त्यांचे कार्य, त्याचबरोबर धार्मिक अधिष्ठानही ठेवले होते ही मोठी कामगिरी. त्यामुळेच ते लोकप्रिय व जनमानसात आदराचे स्थान मिळवते झाले.

या लेखात फक्त ३ व्यवस्थापन प्रणालीच घेतल्या आहेत. वाचकांनी अन्य व्यवस्थापन प्रणाली दासबोध ग्रंथ वाचून समजावून घ्याव्यात हा यामागे उद्देश आहे. कारण दासबोधात जीवनाची सर्व अंगे आहेत. त्या दृष्टीकोनातून समर्थ रामदास स्वामी हे महान तर आहेतच पण सर्व परिपूर्ण व्यवस्थापन गुरु म्हणून आद्य व एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्व आहेत.

दासबोध जस जसा मन लावून वाचाल, मनन चिंतन कराल तसतसे त्याचे उदात्तपण कळत जाईल यात शंका नाही. हा ग्रंथ व्यवस्थापनाचा विश्वकोष (Encyclopedia of the Management Science) आहे यात शंका नाही. अनुभवाधिष्ठित ज्ञान असलेला हा एकमेव ग्रंथ आहे म्हणूनच तो सर्वकाळात उपयोगी आहे. अक्षय मूल्यांचा ग्रंथ आहे.

या लेखात काही त्रुटी असतील तर ते माझे नेणतेपण आहे. क्षमस्व.

हा लेख 'शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे। वसिष्ठासम ज्ञान योगेश्वराचे। कवी वाल्मिकीसारखा मान्य ऐसा। नमस्कार माझा सद्‌गुरु रामदासा।।' अशी प्रार्थना करून 'श्रीराम जयराम जयजयराम' म्हणून त्यांचे चरणी अर्पण करतो. इत्यलम्.

**– वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

•••

ट्रस्टच्या कार्यालयात बांधकाम सुरू असल्याने, ट्रस्टशी केला जाणारा सर्व पत्रव्यवहार व मनीऑर्डर्स सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट द्वारा श्री. प्रकाश दीक्षित, ३०२, दुर्गा को. हौ. सो., शेलार पाडा रस्ता, कोलबाड, ठाणे ४००६०१. या पत्त्यावर पाठवाव्यात अशी विनंती आहे.

(पृष्ठ क्र.४ वरून... **संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

चामीकर म्हणजे सुवर्णालंकार. तो गळ्यातच असतो. पण हरवला समजून त्याचा शोध घेत राहणे.

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड – ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८–२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

•••

(पृष्ठ क्र.८ वरून... **गीतकृष्णायन भाग ५ . कुरूक्षेत्र)**

सर्व मार्गांचा त्याग करून फक्त मी सांगितलेल्या मार्गावरच चाल. केवळ यानेच तुझ्या सर्व पापांचा नाश होईल, सर्व मोहाचं निरसन होईल आणि तू परमपदाला पावशील. हेच माझं तुला निश्चित आणि अंतीम सांगणं आहे!

अर्जुनानं उठून श्रीकृष्णाची पावलं आसवांनी भिजवून काढली, कृष्णा, तुझ्या उपदेशानं माझा मोह दूर झालाय, मन निःशंक झालंय. गांडीव परत उचलून घ्यायला माझे बाहू अक्षरशः स्फुरण पावतायत...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

## हे सम्पूर्ण विश्व भगवान श्रीकृष्णांकरिता एक प्रकारची दुरदर्शन वरील धारावाहिकाचं आहे

वसंत नारायण देशमुख

१. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाची द्विधा मनःस्थिती पाहून उत्सफूर्तपणे त्याला श्रीमदभग्वदगीता सांगून युद्ध करायला उद्युक्त केले असेच सर्व लोक जाणतात पण हे असे नसून निव्वळ ब्रह्मलिखितानुसारच ती सांगितली गेली हे श्रीमदभग्वदगीतेवरूनच कळते. हे कसे ते आपण आता पाहूच.

२. याच्या जोडीला आणखी सुद्धा काही चुकीच्या कल्पना पुष्कळ लोकांच्या मनात ठामपणे घर करून बसलेल्या आहेत त्या येथेंच खाली प्रथम मांडतो.

(क ) पहिली कल्पना ही की प्रत्येक जिवंत व्यक्तीचा आत्मा वेगळा असतो.

(ख) आपण सर्वच म्हणतो की 'प्रयत्नांप्रयत्नांती परमेश्वर' व हे म्हणण्यात आपल्याकडे म्हणजेच आपल्या आत्म्याकडे कर्तृत्व आहे असे गृहीत धरतो.

(ख) तिसरी कल्पना ही की जीवन मरणाच्या फेर्यांतून सुटका होण्यासाठी माणसाला मोक्ष मिळायला हवा. पण मोक्षच नसेल तर काय असा विचारच कुणालाही सुचत नाही.

(ग) चवथी म्हणजे जीव जातो तेंव्हाच प्राणी मरतो.

३. या सर्वच कल्पनांचे केवळ श्रीमद्भगवद्गीतेच्या आधारेच खंडन या लेखांत केले आहे.

४. मात्र हा लेख लिहिण्यापूर्वी प्रथम मी ज्या सर्व थोर संतांनी म्हणजे जगदुरू आदि शन्कराचार्य, संत ज्ञानेश्वर माउली, संत रामदासस्वामी, लोकमान्य टिळक व इतर अनेक यांनी गीतेवर अनेक भाष्ये लिहिली त्या सर्वांची मनःपूर्वक क्षमा मागतो कारण ह्या लेखांत मी लिहिलेला भाग हा कोणीही यापूर्वी लिहिला नाही कारण सर्व काही भगवान श्रीकृष्णांच्या इच्छेनेच घडत असते. त्याप्रमाणेच हा लेखही भगवान श्रीकृष्णच माझ्या हातून लिहून घेत आहेत तरीही मला ह्या भगवान श्रीकृष्णांच्याच वेगवेगळ्या रूपांनी क्षमा करावी हीच मी त्यांना विनन्ति करतो.

५. आपण दूरदर्शनवर मराठी धारावाहिका पाहातोच ना? तद्वतच ही पूर्ण सृष्टी ही भगवान श्रीकृष्णांनी स्वतःचे मन रमविण्यासाठी निर्माण केलेली एक दूरदर्शन वरील धारावाहिके प्रमाणेच आहे. हेही माझे वैयक्तिक मत नसून हेंच गीतेचे एकमेवाद्वितीय रहस्य आहे. वेदांमध्ये एक सुंदर वाक्य आहे ते म्हणजे 'एको हं बहुस्यामः' ज्याचा अर्थ आहे 'मी एकटाच आहे तर आता मी अनेक होतो.' असे म्हणून परमेश्वर अनेक झाला पण तो ते कसा झाला हे गीतेच्या १०व्या अध्यायातील ६ व्या श्लोकावरून सहज कळते.

६. हे रहस्य कळण्यासाठी खाली दिलेले गीतेतील श्लोक वाचा.

(क) महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।
मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः
।।६।।अ.१०.

अर्थ :- सात महर्षी त्यापूर्वींचे चार महर्षी व सर्व मनु हे माझ्याच मनाने निर्माण केलेले भाव आहेत. त्यानीच नंतर ही सर्व प्रजा निर्माण केली.

टीप :- याचाच अर्थ हा की भगवान श्रीकृष्णाच्या मनाने निर्माण केलेल्या ऋषींनी निर्माण केलेली सर्व प्रजा हीसुद्धा त्यांची केवळ मानसिक प्रतिबिंबेच आहेत. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण नाहीतच तर केवळ त्यांची मानसिक प्रतिबिंबे आपण सर्वच आहोत. अगदी आपण जसे मनात काही व्यक्तींची कल्पना करू तसेच. आपले मनच सर्व रूपे घेते. प्रत्यक्षात काहीच नसते. म्हणूनच जगदगुरू शंकराचार्यानी सांगितले की 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या.'

७. हे असे आहे म्हणूनच भगवान श्रीकृष्ण ७ व्या अध्यायाच्या २६व्या श्र्लोकांत सांगतात की,

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन।
भविष्याणि च भूतानि माम तु वेद न कश्चन
।।२६।। अ. ७.

अर्थ :- हे अर्जुना ! पूर्वी होऊन गेलेले सर्व प्राणिमात्र मी जाणतो. आत्ता सर्वत्र असलेले सर्व लोक मी जाणतो. पुढे पूर्ण भविष्य काळांत जन्म घेणारे सर्व लोक मी जाणतो. पण मला मात्र कोणीही जाणत नाही.

टीप १ :- इथे महत्त्वाचे हे लक्षात घ्या की भगवान श्रीकृष्ण जेंव्हा म्हणतात की 'मी लोकाना जाणतो' तेंव्हा आपण जसे पुष्कळ लोकाना तोंडदेखले जाणतो म्हणजे आपण म्हणतोही 'हो कधीतरी भेटल्यासारखे वाटते आहे खरे.' तसे ते तोंडदेखले लोकाना जाणत नाहीत तर प्रत्येक माणसाला अंतर्बाह्य पूर्णपणे जाणतात.

टीप २ :- या श्लोकावर संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीच्या ७व्या अध्यायातील ३१५ ते ३१९ ओव्यांत सांगतात,

(क) जगीं जे जे प्राणी। होवोनिया गेले।
माझ्या चि पावलें। स्वरूपीं ते
।।३१५।।अ.७.

(ख) आणि जे जे कोणी । जगीं विद्यमान ।
मद्रूप जण । ते हि सर्व ।।३१६।। अ. ७.

(ग) ते हि मजहून । वेगळे नाहीत ।
होणार जे येथ। पुढें पार्था ।।३१७।।अ.७.

(घ) एरव्ही केवळ । बोल चि हा देख ।
नाही काही एक। होत जात।।३१८।।
अ.७.

(च) ऐसा अखण्डित । असता मी नित्य ।
संसार चि सत्य। वाटे जीवा ।।३१९।। अ.७.

टीप :- याचा अर्थ हा की सर्वच चराचर प्राणिमात्र हे भगवान श्रीकृष्णांचीच रूपे आहेत. पण वर दिलेल्या १०व्या अध्यायातील ६व्या श्लोकानुसार हे सर्व प्राणिमात्र भगवान श्रीकृष्णांची केवळ मानसिक रूपे आहेत प्रत्यक्ष भगवान नव्हेत.

हा श्लोक आपण आपल्या या संवादाला लावलात तर असे आढळेल की आपण जन्म घेण्यापूर्वीच आपल्यांत असा संवाद होणार हे त्यांना पूर्ण माहीत होते. ७६६५ वर्षांपूर्वी जेंव्हा महाभारताचे युद्ध झाले तेंव्हाच भगवान श्रीकृष्णांना माहिती होते की भविष्यांकाळांत म्हणजे इ. स. वि. सनाच्या २०१७ सालच्या ऑगस्ट महिन्याच्या आठव्या दिनांकाला ते स्वतःच वसंत नारायण देशमुख याचे मानसिक रूप घेऊन आपणा सर्वांची अनेक मानसिक रूपे घेऊन हे गीतारहस्य आपल्यापर्यंत पोहोचवणार आहेत. तर तुम्ही व मी व आपण सर्वच भगवान श्रीकृष्णांची मानसिक रूपे आहोत म्हणूनच ते तेंव्हाही जाणत होते की असा संवाद आपल्यांत होणार. बरे भूतकाळांत होऊन गेलेल्या, त्यावेळी जगांत राहाणाऱ्या व भविष्यकाळातही जन्म घेणाऱ्या सर्वांना मी जाणतो असे नुसतेच सांगितले नाही तर त्याचा पुरावाही लगोलग दिलाच. तो कसा ते पाहा.

८. ४ थ्या अध्यायाच्या पहिल्याच श्र्लोकांत ते अर्जुनाला सांगतात की हा कर्मयोग मी पूर्वीच सूर्याला सांगितला होता.

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययं । विवस्वान मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेब्रवित ।।१।।अ. ४.

अर्थ :- हा योग ( म्हणजे कर्मयोग ) मी पूर्वी सूर्याला सांगितला होता. त्याने तो मनूला सांगितला व मनूने तो पुढे इक्ष्वाकुला सांगितला.

यावर अर्जुनाची प्रतिक्रियाही आपली आता जशी होते आहे तशीच झाली. तो त्यांना ४थ्याच श्लोकांत विचारतो तू तर माझ्यापेक्षा वयाने अल्पसाच मोठा आहेस व तो सूर्य तर लक्षावधी वर्षांपूर्वी होऊन गेला आणि तू मला सांगतो आहेस की तू त्याला हा कर्मयोग सांगितलास तर मी हे कसे मानावे? तेंव्हा त्यांनी अर्जुनाला सांगितले की आपले अनेक जन्म होऊ गेले. मी ते सर्व जाणतो मात्र तू ते सर्व विसरला आहेस. मग त्यांनी त्याला त्या वेळेच्या अगदी जवळच्या भविष्यकाळांत घडतील अशा घटना सांगितल्या. गीतेच्या ११ व्या अध्यायातील ३३ व्या व ३४व्या श्लोकांत ते अर्जुनाला सांगतात की 'मी तुझ्या सर्व शत्रूंना आधीच मारले आहे तेंव्हा तू आता केवळ निमित्तमात्र संहारक हो. त्यावेळी ते सर्व शत्रू जिवन्तच होते. एवढेच नाही तर सर्वांत महत्त्वाचे म्हणजे युद्धांत माणसे मरतच असतात' तरी आधीच्या ३२व्या श्लोकांत 'ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे' म्हणजे 'तुम्ही सर्व पांडव मात्र वगळून इतर सर्व उरणार नाहीत म्हणजेच मरतील. हेही सांगितले होते.' आता या सर्वाचा संबंध सांगतो.

९. जेंव्हा भगवान श्रीकृष्णांनी सूर्याला कर्मयोग सांगितलं तेंव्हाच त्यांना, ७ अध्यायातील २६व्या अन्वये हेही ठाऊक होते की द्वापार युगाच्या शेवटी महाभारताचे युद्ध होणार. त्यांत प्रारंभीच मायावश होऊन अर्जुन म्हणणार की मी युद्ध करणार नाही. मग मी त्याला गीतोपदेश देणार व त्यानंतरच तो युद्ध करणार. याचा अर्थ हा नाही का की गीता भगवान श्रीकृष्णांनी

(पृष्ठ २६ वर)

पांचरात्र आगमाच्या रत्नत्रयीतील पौष्कर संहितेवरील (अं. ३०० इ.स.) अर्थोपादक परमेश्वरसेहिता (अं. ७०० इ. स.) यात श्रीरंग माहात्म्य हा १० वा अध्याय आहे. त्यात श्रीरंगम् (त्रिचनापल्लीपासून ६ मैल कावेरी नदीतील बेट). देवळाचा तपशील दिला आहे. तो प्रत्यक्ष महाप्रचंड देवळाशी ताडून पहाण्याचा उद्योग १० पी.एच.डी. प्रबंधांना उपयोगी पडू शकतो. या क्षेत्रावर अधिष्ठान असलेली पौष्कर संहिता (साम्राज्यंम् अधितिष्ठति) आणि परमेश्वरसंहिता कार्यकारी प्रवर्तते। त्यात देवालयांचे प्रकार दिले आहेत. १. स्वयंव्यम म्हणजे तपश्चर्येतून भगवन्तानीं स्वतः आविष्कार केलेले (वास्तविक हा स्थपतींवर अन्याय आहे). अशी विष्णूची ४ देवळे – १. नारायण – यदुशैल मेलकोटे कर्नाटक २. श्रीरंगम् ३. विष्णुकांची (तामिळनाडू) ४. तिरुपती (आंध्र). त्यापैकी तिरुपतीची पूजा बैखानस पद्धतीने (पण पद्मावतीची पांचरात्र पद्धतीने) बाकी तीन पांचरात्र. २. सैद्ध म्हणजे सिद्ध पुरुषांनी स्थापलेली. ३. दैव म्हणजे देवानी स्थापलेली उदा. श्रीरामानी प्रतिष्ठा केलेले रामेश्वर ४. आर्ष म्हणजे ऋषी स्थापित. आणि ५. मानवानी स्थापन केलेली म्हणजे राजे किंवा धनिकानी स्थापलेली. तर विष्णुकांचीचे स्वयंव्यक्त. जयाख्यसंहिता (५०० A. D.) ही तिथली सार्वभौम साम्राज्यम् अधितिष्ठति आणि पाद्मसंहिता व्याख्यारुपा (८०० इ.स.) कार्यकारी. पाद्मसंहितेत खरेतर हस्तिशैल माहात्म्य हा अध्याय पाहिजे पण तो जयाख्य संहितेत अधिकः पाठः म्हणून आला आहे. त्या मंदिराच्या निर्मितीपूर्वी हस्तिशैल म्हणजे हतीच्या आकाराची प्रचंड मोठी शिलाच होती. त्यावर आता वरदराजाचे मंदिर उभे आहे. निगम परंपरा तिथपर्यंत येऊन भिडते. ब्रह्मदेवाने त्या शिळेवर अश्वमेध केला. (इते अजः वाजि (अश्व) मेधेन) म्हणजे त्याने घोड्याची आहुती अर्पण केली. ती देखील विष्णूला म्हणजे यज्ञसंस्थेचे वैष्णवीकरणाची प्रक्रिया झाली असावी. अग्नीमधून तो प्रकट झाला तो ओठात अश्वाची वपा (चरबी किंवा मज्जा) धरुन संतुष्ट होऊन ब्रह्मदेवाला वरदान म्हणून तिथे ते स्वयंव्यक्त देवालय प्रकटले. अन्यत्र यज्ञसंस्थेचे वैष्णवीकरण झाल्याचे उदाहरण आहे. चतु:स्थानार्चन तिथे फक्त विष्णूलाच हविर्भाग दिल्यामुळे इन्द्रादिदेव रागावतात. त्यात ब्रह्मा पण आहे. विष्णू त्यांना असे सांगतो की ब्रह्मदेवाने सर्व देवांना निर्माण केले आणि मी ब्रह्मदेवाचा निर्माता. तर तुम्ही सर्वांनी मलाच हविर्भाग द्यावा. मानवनिर्मित देवालयातून जे पुण्य निर्माण होते त्याची तुलना यज्ञातून मिळणाऱ्या पुण्याशी करून आगम ऋषींनी एक Conversion table च तयार केले व हळूहळू राजे आणि धनिक यांना मूर्ति निर्माणाकडे आकृष्ट केले. त्यात शंकराचार्यांनी पोचरामाचे खंडण करताना अंशविराकरण करून मंदिरसंस्कृतीला सूट दिली. त्यांच्या वारसानी पंचायतन कल्पना रुढ केली. आणि रामानुजांनी मंदिर निर्माणाची मोहीमच यशस्वी केली. असा हा अगम धर्म.

**– प्रभाकर आपटे**

# कौटिलीय अर्थशास्त्रातील शिक्षण-विषयक संदर्भ

डॉ. वैशाली जयंत दाबके

मागील लेखात, कौटिलीय अर्थशास्त्रातील, राजाच्या शिक्षणासंबंधी विवेचन पाहिले. हा ग्रंथ राजाला मार्गदर्शन करण्यासाठी रचला आहे हे निश्चित. परंतु राजा एकटाच राज्यकारभार सांभाळू शकत नाही. 'सहाय्यसाध्यं' राजत्वम् (राजेपण सहाय्यानेच यशस्वी होते) असे कौटिल्यही म्हणतो. म्हणूनच मंत्री, पुरोहित, अमात्य, दूत तसेच विविध खाती सांभाळणारे अध्यक्ष हा राज्यकारभारातील महत्त्वाचा घटक आहे. राजासाठी जसे विशिष्ट विद्यांचे शिक्षण आवश्यक आहे तसेच विविध खात्यांच्या धुरा सांभाळणाऱ्या अध्यक्षांसाठीही, याची जाणीव कौटिल्याला आहे. म्हणूनच या अध्यक्षांसाठी त्यांच्या त्यांच्या खात्यांतील कर्तव्यानुसार मूलभूत शैक्षणिक अर्हता कौटिलीय अर्थशास्त्रात सांगितली आहे. कौटिलीय अर्थशास्त्रातील 'अध्यक्षप्रचार' या दुसऱ्या अधिकरणात विविध खाती सांभाळणाऱ्या सुमारे २६ अध्यक्षांच्या कर्तव्यांची आणि कामकाजाची सविस्तर माहिती दिली आहे. त्यामध्ये अध्यक्षांची कर्तव्ये सांगण्यापूर्वी त्यांनी शिकण्यास योग्य अशा विद्या, शास्त्रे यांचे निर्देश येतात. काही ठिकाणी अशा विद्यांचा साक्षात निर्देश नसला तरी अध्यक्षांसाठी सांगितलेल्या कर्तव्यांवरून त्यांच्या अपेक्षित शिक्षणाविषयी अंदाज करता येतो.

या विद्यांचे शिक्षण हे लौकिक व्यावसायिक शिक्षण होय. परंतु कौटिल्याच्या मतानुसार सर्व अध्यक्षांच्या व्यक्तिमत्वात काही अंगभूत गुण असणे आवश्यक असते. या सामान्यतः आवश्यक असणाऱ्या गुणांची चर्चा कौटिल्याने अध्यक्षांची कर्तव्ये सांगण्यापूर्वी म्हणजे पहिल्या अधिकरणात केली आहे. अध्यक्षांचे गुण पुढीलप्रमाणे - अध्यक्ष राज्याचा नागरिक असावा. कुलीन, ताब्यात ठेवण्यास सुलभ, कलावान, बुद्धिमान, शास्त्रदृष्टी असलेला, कुशल, बोलण्यात प्रवीण, धीट, समयसूचक, उत्साही, सामर्थ्य असणारा, आचरणाने शुद्ध, मैत्री करू शकणारा, स्वामिनिष्ठ, शील-बल-आरोग्य-सत्त्वगुणांनी युक्त, कुणाशीही वैर न करणारा असावा. हे सर्व गुण ज्याच्या व्यक्तिमत्वात असतात तो उत्कृष्ट अध्यक्ष असे कौटिल्य म्हणतो. हे अंगभूत गुण असलेला मनुष्य अध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास योग्य असतो. परंतु विशिष्ट खात्याचे कामकाज पाहाण्यासाठी, या गुणांशिवाय, विशिष्ट विद्या अथवा शास्त्रांचे व्यावहारिक, व्यावसायिक शिक्षण आवश्यक असते. हे लौकिक (Formal Education) ज्ञान, कौटिल्यकालीन शिक्षण पद्धतीचा घटक असावा असे दिसते. राजाच्या शिक्षणाव्यतिरिक्त, कौटिलीय अर्थशास्त्रात आलेले, अध्यक्षांच्या लौकिक शिक्षणाविषयीचे संदर्भ पुढीलप्रमाणे- आकराध्यक्ष म्हणजे खाणींच्या अध्यक्षाला शुल्वशास्त्र म्हणजे जमिनीतील शिरांचा

अभ्यास करणारे शास्त्र, धातुशास्त्र, रसपाक म्हणजे धातु-शुद्धिकरणशास्त्र, मणिराग म्हणजे विविध रंगांच्या रत्नांची परीक्षा करणारी विद्या यांचे ज्ञान असावे असे म्हटले आहे.

सुवर्णाध्यक्ष म्हणजे सुवर्णावर प्रक्रिया करण्याच्या कारखान्यांचा अधिकारी याला सुवर्ण व इतर धातुंवर प्रक्रिया करण्याचे शास्त्र, सुवर्णवस्तूंचे कारखाने उभारण्याचे शास्त्र, सुवर्णाचा कस जाणण्याची विद्या इ. माहिती असणे अपेक्षित होते. कोष्ठागाराध्यक्षाला शेतीचे शास्त्र, खरेदी-विक्री प्रक्रिया, बचत व खर्च यांचा मेळ तसेच पण्याधक्षाला म्हणजे व्यापारावरील मुख्य अधिकाऱ्याला, जमिनीत आणि पाण्यात तयार होणारे पदार्थ, खुष्कीच्या आणि जलमार्गाने आलेल्या परदेशी पदार्थांच्या कमीअधिक किमती, वस्तूंच्या दरांतील चढउतार, लोकांच्या आवडीनिवडी, वस्तूंच्या क्रय-विक्रयासाठी उचित स्थळकाळाचे ज्ञान व भान असणे आवश्यक होते. आयुधागाराध्यक्ष म्हणजे शस्त्रागारावरील अधिकाऱ्याला शत्रूचा नाश करणारी यंत्रे, शस्त्रे तसेच चिलखते, अवजारे इतकेच नाही तर त्यांची रुपे, लक्षणे, प्रमाण, किंमतीही माहित असाव्यात अशी अपेक्षा होती.

सीताध्यक्ष म्हणजे शेतीवरील प्रमुख अधिकाऱ्याला कृषिशास्त्र, शुल्वशास्त्र, वृक्षायुर्वेद, हवामान (विशेषेकरून पावसाचा अंदाज) याविषयींचे शास्त्र यांचे ज्ञान असावे असे म्हटले आहे.

याशिवाय पौतवाध्यक्ष-वजन-मापे यांवरील अधिकारी, मानाध्यक्ष-मोजणीवरील अध्यक्ष, शुल्काध्यक्ष-जकातीवरील अध्यक्ष, सूत्राध्यक्ष-सूत व कापड उत्पादनांचा अधिकारी, नावध्यक्ष-नावांवरील अध्यक्ष, गोध्यक्ष-गुरांवरील अध्यक्ष, अश्वध्यक्ष-अश्वशाळेचा अधिकारी, हस्त्यध्यक्ष-हत्तीपागेवरील अध्यक्ष, पत्त्यध्यक्ष-पायदळावरील अधिकारी, नागरिक-नगराध्यक्ष, इत्यादी विविध अध्यक्षांच्या प्रत्यक्ष शिक्षणाविषयी निर्देश नसला तरी त्यांच्याकरिता सांगितलेल्या कर्तव्यांचा विचार केला की लक्षात येते की प्रत्येक अध्यक्षाला त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी अनेक विद्यांचे व गोष्टींचे सखोल ज्ञान असण्याची आवश्यकता होती. एकटा राजा ज्याप्रमाणे राज्यकारभार संपूर्णतः पाहू शकत नाही त्याप्रमाणे एकटा अध्यक्षही संपूर्ण खात्याचा कारभार सांभाळू शकत नाही हे लक्षात घेऊन त्यात्या खात्यांशी संबंधित शास्त्रे शिकलेले अधिकारी अध्यक्ष नेमत असे. परंतु हे अधिकारी नेमून दिलेले कार्य योग्यपद्धतीने करत आहेत की नाही हे जाणण्यासाठीही अध्यक्षाला त्याच्या खात्याशी संबंधित शास्त्रे शिकणे अनिवार्य होते.

अध्यक्षांनी शिकायच्या या शास्त्रांचे अध्ययन अध्यापनाचे स्वरुप कसे होते याविषयी कौटिलीय अर्थशास्त्रात सांगितलेले नाही. कौटिलीय अर्थशास्त्राचा तो विषय नाही. कौटिलीय अर्थशास्त्राच्या काळाचा विचार करता इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात गुरुकुले अस्तित्वात होती. तक्षशिला

विद्यापीठही होते हे निश्चित. ज्ञानदान करणाऱ्या या संस्थांमध्ये वैदिक वाङमय, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र इत्यादी विषयांसह वृक्षायुर्वेद, गजशास्त्र, कृषिशास्त्र इत्यादी शास्त्रेही शिकवली जात असे दिसून येते. इतकेच नाही तर ज्याअर्थी या विविध ज्ञानशाखांचा शास्त्र अथवा विद्या म्हणून निर्देश येतो त्या अर्थी त्यांचे सुसूत्र विवरण करणारे शास्त्रीय ग्रंथ व असे ग्रंथ रचणारे ग्रंथकर्ते आचार्यही होते आणि महत्त्वाचे म्हणजे या शास्त्रांतील सिद्धांतांचे समाजहितासाठी प्रत्यक्ष उपयोजन करणारे अध्यक्ष होते.

वरील सर्व विवेचनातून विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट अशी की कौटिल्याने राज्याच्या विविध खात्यांचा कारभार सांभाळणाऱ्या अध्यक्षांचे अंगभूत गुण आणि त्यांची शैक्षणिक अर्हता सुनिश्चित केली होती. आजच्या काळात मात्र विविध पदे आणि खाती सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेबद्दल कोणतेही निश्चित कायदे नाहीत. आपले पूर्वज आपल्यापेक्षाही विचाराने प्रगल्भ आणि सुजाण होते, प्रगतीशील होते, हेच यातून पुन्हा एकदा सिद्ध होते.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

•••

(पृष्ठ क्र. २२ वरून... **हे सम्पूर्ण विश्व भगवान श्रीकृष्णांकरिता एक प्रकारची दुरदर्शन वरील धारावाहिकाचं आहे** )

उत्सफूर्तपणे सांगितली नसून तीही पूर्णपणे पूर्वनियोजित अशीच होती. असे असले तरी मुख्य गोष्ट ही आहे की हे सर्व भगवान श्रीकृष्णांचे केवळ एक मनोगुजच आहे. आपण जसे मनोराज्य करतो अगदी तसेच म्हणूनच म्हणतो की 'हे संपूर्ण विश्व भगवान श्रीकृष्णांकरिता एक प्रकारची दूरदर्शन वरील धारावाहिकाचं आहे.' आता तुम्ही हे सर्व वाचाल की नाही हे मला माहिती नाही पण ते भगवान श्रीकृष्णांना ७५६५ वर्षांपूर्वीच माहिती होते. असो.

आपला शुभेच्छुक मराठी महाराष्ट्रभक्त मित्र,

**वसंत नारायण देशमुख**
विधिज्ञ विंग कमांडर (निवृत्त)
ए-२/५०४, श्रीराम व्हाईट हाऊस,
६ वा मेन, १५ वा क्रॉस,
आर. टी. नगर, बेंगळुरू,
कर्नाटक राज्य - ५६००३२
दूरध्वनी क्रमांक : ०८०-३६९२१८०
भ्रमणध्वनि : ९६८६५४५०९३

•••



## श्रीकृष्ण स्तवन - जन्माष्टमी

**सौ. निलम काळीकर**

उधळी फुले मनोहर तो श्रीमहागणपती ।
छेडूनी सरगम करी आरती ती माँ सरस्वती-
भगवती।।
सूरगणांसह दर्शना आले श्री परम शिव-पार्वती।
'अजन्मा जन्मासी आला' कलहपरायण
नारद सांगती ।।१।।

कारागारी, अंध:करी, मध्यरात्री कृष्ण हो जन्मला।
श्रावण वद्य अष्टमीस अजन्मा जन्मासी आला ।।
श्रीकृष्ण नाम याचे विष्णुच भूवरी हा ।
धर्मास रक्षण्याला योगिन्द्र जाहला हा ।।२।।

जयदेव जयदेव जय श्रीदेवकीगर्भसंभूता ।
जयदेव जयदेव जय श्रीयशोदावत्सल नन्द-
नन्दना ।।
जयदेव जयदेव जय श्रीबालमुकुन्दा ।
जयदेव जयदेव जय श्रीगोलोक-
वैकुंठपीठविहारा ।।३।।

प्रलय घन दाटले सौदामिनी लखलखे ।
प्रकटता झंजामारुत तांडव प्रभंजन करे ।।
जलदजाल वितुळले, जलनिधी साठले ।
कासावीस कृष्णस्पर्शी यमुना, घडी घडी
उचंबळे ।।४।।

पाहोनी नृत्यकला यमुनेची, पाती सूरनेत्र
हालवूं विसरले ।
धिमकिटी धिमकिटी तकधा विचित्र, राग
गौलता संगीतशास्त्र ।।
अहो कृष्णस्तवनी सहस्त्रमुखी शेष तो भागला ।
अन अनंतासी छत्र धरण्या त्वरित अनंत तो
धावला ।।५।।

भक्तीसी निर्गुण निराकार परब्रह्म द्रवले ।
सुखाचे सागर, चिमुकले होवूनी पाळणी
पहुडले ।
नन्दाघरी घडे चौघडे, नौबती त्या झडल्या ।
होत शंखनाद सनयाही त्या वाजल्या ।।६।।

सखे गं कर्णमधूर मृदंग मंदिरात वाजला।
स्वर्गीच्या दुंदूभींचा अनहत नाद आसमंतात
गुंजला ।
हर्ष तो पशुपक्ष्यांचा मयुरासवे उन्मादिला ।
साथीस साथ कोकिळेने पंचम स्वर
आळविला ।।७।।

नाचू लागले गोप-गोपी, गोकुळ सारे आनंदानें ।
नाचू लागली नन्द-नन्दराणी भान हरपुनी
हर्षाने ।।
पडे पदरी कैवल्यनिधान कोटीकोटी पुण्याई ।
मिठाई, पेढे, लड्डू बोलती बधाई हो
बधाई यशोदामाई ।।८।।

ढोल नगारे वाजवा रे वाजवा, अबीर
गुलाल उधळा रे उधळा ।
अनंत आले गोकुळी शुभ मंगल गाने घरोघरी ।।
सडे सजले रांगोळ्यांनी-गोकूळ मार्गोमार्गी ।
गुढ्यातोरणे छान ऊभी, स्वागती दारोदारी ।।९।।

उंच माझा झोका झुलवी हरी तुज गगनांतरी ।
अथांग सागरी भक्तिरंग उफळे पुनवेपरी ।।
भक्तीत चाखती, भक्त तुझे, भक्तीचा मधूर
गोडवा ।
जणूं मकरन्द सेवी भ्रमर, कमलमधूचा
आस्वाद आगळा ।।१०।।

गायीली स्तुतीं स्तोत्रें, ऋषी, मुनी, देवतांनी।
राजर्षी, ब्रह्मर्षी, देवर्षी गंधर्वांनी ।।
किती यत्ने, किती साधने प्रार्थी तूजसी ।
भवभंजना, भवहृदया निलमही आळवी
तुजसी ।।११।।

पुरुषसूक्तादिकांसवे ज्ञानी तूज स्तविती ।
भक्तमंगलविग्रहा भक्तीसंगे भजनांत स्वत:रंगसी।।
नाम गाजरासवे आषाढी कार्तिकी एकादशीशीं।
भक्ताभिष्टप्रदा, दिंडीत, दंग भक्तांसावे स्वत:
नाचसी ।।१२।।

कुरुक्षेत्री रणी पांञ्चजन्य फूंकिला ।
धरी ना शस्त्राते ब्रीदवाक्य बोलीला ।।
दयार्द्र मुकुटमणी श्रद्धेस्तव शोभला ।
भक्तिपरिमळे भक्तास परिस
गवसला।।१३।।

दूष्ट हेत, नष्ट होत, षडयंत्र उधळत ।
तूच अजिंक्य, तूजसमोर कोणी नूरत ।।
'कृष्णनीती'-'जगत् श्रेष्ठ', 'जगन्मान्य', 'अद्भुत' !
महती तव अनंत, हस्ती सुदर्शनचक्र धरत
।।१४।।

'सहस्त्रनामे' भूषवी भीष्मपितामह तूजसी ।
'लक्षनामे' तोषवावे हीच ईच्छा मन्मनासी।।
घडेना मजकरवी तरी लाखलाखदा आठवीन।
श्रीकृष्णा नितांत गाथा मात्र मी तुझीच
गायीन ।।१५।।

**सौ. निलम काळीकर**
पवनी
मोबाईल: ९८५०९ ८०६९६

●●●

या अंकावर चिकटवलेली चिठ्ठी आपली किती देणगी २०१९ मार्च पर्यन्त देय आहे त्याची नोंद आहे. संपूर्ण रक्कम देणे काही कारणाने शक्य नसेल तर आपणास जास्तीत जास्त जेवढी देणगी देणे शक्य असेल तेवढी देणगी पाठवलीत तरी चालेल. अंकाच्या निर्मिती खर्चात दिवसेंदिवस होणारी वाढ लक्षांत घेऊन व गेल्या ५२ वर्षांपासून सुरू असलेला हा अंक असाच चालू रहावा, म्हणून ही विनंती करीत आहोत. ज्या देणगीदारांच्या पाकीटावरील लेबलवर जुआ (जुना आजीव) वा आ (आजीव) व वर्ष याची नोंद आहे. त्या सर्व देणगीदारांना विनंती आहे की वाढता खर्च पाहता, आपण जास्तीत जास्त देणगी पाठवावी अशी विनंती आहे. काही कारणाने आपणास अंक नको असेल तर संपर्क* करून तसे कळवावे. धन्यवाद!

**– कार्यकारी विश्वस्त/ संपादक**

एप्रिल२०१८ अंकापासून अंकांचे पाकीटा वरील पत्त्याची लेबल छापण्याच्या संगणक प्रणालीत मोठा बदल करावयाचा असल्याने, जुन्या प्रणालीतील सर्व माहिती परावर्तीत करून नव्या प्रणालीत वापरण्यात आली आहे. असे परावर्तन करताना शक्य तेवढी जास्तीतजास्त काळजी घेतली आहे. तरीही आपल्या व्यक्तीगत माहितीत कांही दुरूस्ती करणे आवश्यक असल्यास कृपया *श्री. प्रकाश दीक्षित. का. विश्वस्त यांच्याशी, पत्र, पोस्टकार्ड पाठवून.किंवा ०२२२५४७२००५ वा ९०८२९९०४३१, ९८१९६९३१९५ (Whatapp नंबर) या क्रमांकावर संपर्क साधुन कळवावे. आपले रेकॉर्ड पाहून योग्य ती दुरूस्ती करणे शक्य होईल.

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

अशा या व्यापक संकल्पनेला काही घटक जर आकुंचित करु लागले तर त्याकडे फक्त बघ्याची भूमिका घेवून चालणार नाही. हिंदू धर्मामध्ये गाय देवता मानली आहे. तरीही या व्यवस्थेमध्ये गोमांस भक्षण करणारा वर्गही होताच. शिवाय गेली काही हजारो वर्षे स्थायिक झालेले इतर धर्मियही गोमांसभक्षण करतच होते. शाकाहार, मांसाहार यासंदर्भातही अनेक मतमतांतरे आहेत. मानवतावाद, भूतदया या सगळ्या अंगांनी याची चर्चा होत असते. पण म्हणून कोणी एकमेकाच्या जीवावर उठून यासंदर्भात आपल्या विचारांशी सहमत नसलेल्या व्यक्तींचे जीव घेत नाही. दुर्दैवाने गेल्या काही महिन्यात अशा ज्या घटना घडल्या त्या व्यथित करणाऱ्या आहेत. यापेक्षाही मोठे दुर्दैव म्हणजे या घटना हिंदू धर्माचे रक्षण करण्याच्या नावाखाली होत आहेत. त्याहीपेक्षा मोठे दुर्दैव म्हणजे राजकीय, सामाजिक आणि धार्मिक नेतृत्वाने याची करायला हवी तेवढी निंदाही केलेली दिसत नाही. अर्थात गुळमुळीत व देखाव्याची वक्तव्ये खूप झाली. थोर क्रांतिकारक व हिंदू विचारधारेचे खंदे पुरस्कर्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीही गाईला उपयुक्त पशू मानले आहे.

चीनपासून मध्य, दक्षिण आशिया खंडात बौद्ध-हिंदू तत्वज्ञान परंपरांचा प्रसार हा शुद्ध वैचारिक आदानप्रदानातून झाला. अनेक बौद्ध तत्वज्ञानाचे आणि विज्ञानाचे संस्कृत ग्रंथ त्यामुळे भाषांतरीत झाले. पूजा, सणांपेक्षा योग, आयुर्वेद यांचे ग्रंथ आणि व्यवस्थांचा स्वीकार त्या त्या संस्कृतींनी केला. यामुळेच विशेषतः दक्षिण पूर्व आशियात त्याच्या बोलींमधून मोठ्या प्रमाणावर संस्कृत शब्दही आढळतात. अहिंसक धर्म प्रसाराचे यापेक्षा चांगले उदाहरण जगात सापडणार नाही.

हिंदूंच्या धर्मप्रसार पद्धती, आणि इस्लाम आणि ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या पद्धती यामध्ये म्हणूनच मूलगामी फरक आढळतो.

हिंदू तत्वज्ञानाचा गंधही नसलेल्या, गळ्यापर्यंत भ्रष्टाचारामध्ये बुडालेल्या राजकारणी आणि व्यावसाईक बाबा, आणि महंतांचे धर्म प्रेम आणि धर्म रक्षणाची म्हणूनच गांभिर्याने दखल घ्यायला हवी. महाराष्ट्रात तरी आपल्या सणांचा राजकारण्यानी घेतलेला ताबा, आणि त्याचे चालवलेले बकालीकरण आणि व्यावसायीकरण याचा धर्म रक्षणाशी काडीचाही संबंध नाही. हे समजून घेणे म्हणूनच गरजेचे आहे.

गेल्या दोनचारशे वर्षांमध्ये हिंदू तत्त्वज्ञान, जीवनपद्धती आणि त्याचे प्राचीनत्व याचा अभ्यास आणि संशोधन करण्याची स्फूर्ती जगातल्या अनेक धर्मप्रसारक आणि अभ्यासकांना झाली. ही जिज्ञासा, हिंदू गोमांसभक्षण करतात की करत नाहीत, त्यांची मूर्तीपूजा, होमहवन इत्यादींपेक्षा त्यांचे तत्वज्ञानाचे ग्रंथ, अर्थात उपनिषद, व दार्शनिक ग्रंथ यांच्यामुळे झाली. याची सुरुवात पाचव्या शतकामध्ये गुंडीशापूर या इराणमधल्या ज्ञानपीठापासून झाली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्याला सप्रमाण पुरावा आहे असा भारतातील पहिला भाषांतरीत ग्रंथ हा 'पंचतंत्र' आहे. त्यावेळी त्याचे पहेलवी व जुन्या सिरीयन भाषेमध्ये भाषांतर झाले व ८ व्या १०व्या शतकापासून पंधराव्या

शतकापर्यंत मध्यआशियापासून युरोपपर्यंत सर्व भाषांमध्ये त्याची भाषांतरे झाली. हा ग्रंथ देवदेवतांचा नसून प्राण्यांच्या कथांच्या माध्यमातून दैनंदिन जीवनातील व्यवहारचातुर्याचे ती उदाहरणे आहेत. त्याच सुमाराला ब्रह्मगुप्ताची गणिती कोष्टकं भाषांतरीत झाली. गणित ग्रंथांच्या भाषांतराची ६-७ व्या शतकात सुरु झालेली ही साखळी १६ व्या शतकांपर्यंत सुरु होती. 'शून्य' आणि 'अंक' हे भारताने जगाला दिलेली एक मोठी देणगी आहे. याबद्दल आता दुमत नाही. चौथ्या-पाचव्या शतकातील बखशाली हस्तलिखितात त्याची नोंद आहेच, आणि सातव्या शतकातील सिरीयन धर्मगुरु सिव्हीरस सेबोख्त यांनीही हीच माहिती जगाला दिली. चिनी प्रवासी युवेश सेन (xuan zang-602-644 AD) यांनीही भारतीय जीवनपद्धतीचे बरेच वर्णन करून ठेवले आहे. आपल्या प्रसिद्ध तक्षशिला विद्यापिठात त्याने काही काळ अध्ययन केल्याचीही नोंद आहे.

१६-१७ व्या शतकात युरोपियन वसाहतवादाला सुरुवात झाली आणि भारतीय जीवनशैलीच नाही तर भारताच्या भौतिक व आधिभौतिक विचारांचा सखोल अभ्यास पाश्चात्यांनी सुरु केला. सुरुवातीला आघाडीवर फ्रेंच अभ्यासक होते. फ्रेंच राजा पंधरावा लुई याच्या ग्रंथपालाने १८ व्या शतकाच्या सुरुवातीला भारतामध्ये धर्मप्रसारासाठी आलेल्या जेजुइट धर्मप्रसारकांना संस्कृत हस्तलिखितं जमवून आणायला सांगितली. युरोपमधल्या संस्कृतच्या शास्त्रशुद्ध हस्तलिखित संग्रहाची ही सुरुवात म्हणायला हरकत नाही. बंगालमधील चंद्रनगर येथील फ्रेंच वसाहतीतील धर्म प्रसारक जाँ फ्रांक्वाज पाँ (Jean - Francois Pons) यानी अनेक विषयावरील संस्कृतची हस्तलिखितं जमवून त्याचे वर्गीकरण करून फ्रान्स मधील या ग्रंथालयात जमा केली. ॲन्तोन लिओनार्द (Antoine Leonard Chezy) हे फ्रान्स व यूरोपमधील पहिले संस्कृत शिक्षक. पाँच्या जमा केलेल्या संस्कृत हस्तलिखितामधून ते संस्कृत शिकले. याच परंपरेतील अनेक फ्रेंच संस्कृत अभ्यासकांनी भारतीय खगोलशास्त्र, गणितशास्त्र व जीवनशैली यावर अनेक अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिले. फ्रेंचांची ही परंपरा आजही चालू आहे. त्याहूनही अधिक मोठी परंपरा जर्मन लोकांची आहे ती सर्वांना ज्ञातच आहे. हॉलंडपासून रशियापर्यंत बहुतेक सर्व देशांनी भारतीय तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास करून ठेवला. दैवतशास्त्राचा अभ्यासही त्यांनी मोठ्या प्रमाणात केला असला तरीही त्यांचे खरे आकर्षण हे वेद, उपनिषद व भारतीय दर्शनशास्त्र हेच राहिले आहे.

फ्रेचांनी याबाबतीत संस्कृत अध्ययनात आघाडी घेतली होती तरीही त्याच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाला सुरुवात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रज वसाहतवाद्यांनी केली.

सर विल्यम जोन्स (Sir William Jones) यांच्याकडे या अभ्यासाचे अध्वर्युपद जाते. १७८४ साली त्यांनी बंगालला एशियाटिक सोसायटीची स्थापना केली. १७८८ साली त्यांनी एशियाटिक रिसर्चेस (Asiatick Researches) ही संशोधन पत्रिका या अभ्यासाकरता चालू केली. त्यामध्ये भारतीय वनस्पतीशास्त्रापासून ते तत्वज्ञानापर्यंत अनेक लेख पुढील शतकात

प्रकाशित करण्यात आले. आज आपण शिकत असलेल्या आपल्या इतिहासाचा मूळ स्रोत हे लिखाण आहे. या संशोधन पत्रिकेच्या लगेचच इंग्लंड व युरोपमध्ये त्या त्या भाषांमध्ये आवृत्याही निघू लागल्या. भारतासंबंधातील शास्त्रशुद्ध अभ्यासाला या संशोधन पत्रिकांनी १८-१९ व्या शतकामध्ये फार मोठ्या प्रमाणात हातभार लावला.

विल्यम जोन्सनी हे काम १७८४ साली चालू केले असले तरी याची खरी सुरुवात ही, जेजुईट धर्मप्रसारक आपले अनुभव व अभ्यासाची टीपणं पत्र स्वरुपात युरोपमध्ये आपापल्या देशात पाठवलेल्या पत्रांमधून झाली. या पत्रसंग्रहांचे संकलन करून Lettres editiantes et curieuses या शीर्षकाखाली यांचे खंड प्रकाशित झाले. यामध्ये मात्र भारतीय तत्वज्ञानापेक्षा भारतीय जीवनशैली, उपासना पद्धती, मूर्तीपूजा, देवळांची रचना यांची वर्णने अधिक आहेत. १७७१ मध्ये अब्राहम अंक्वातिल द्यूपेराँ (Abraham Anquetil Du perron) यांनी पारशी धर्मग्रंथ अवेस्ताचे भाषांतर प्रकाशित केले. त्याबरोबरच त्यांनी अनेक संस्कृत हस्तलिखितेही जमा करून फ्रान्सच्या ग्रंथालयात जमा केली. दयूपेराँ या शृंखलेतील विल्यम जोन्स एवढाच महत्वाचा दुवा आहे. अवस्ताप्रमाणेच त्यानी औरंगजेबाचा भाऊ दारा शिकोह यांनी १६५७ मध्ये उपनिषदांचे पर्शियन भाषेतील केलल्या भाषांतराचे फ्रेंचमध्ये भाषांतर केले. ते अप्रकाशित राहिले. १८०१-०२ मध्ये त्याचे लॅटिनमध्ये भाषांतर झाले. अभ्यासकांच्या मते हे भाषांतर अत्यंत बोजड आणि फारसे चांगले नाही. तरीही या भाषांतराने यूरोपमधील प्रज्ञावंतांमध्ये भारतीय तत्वज्ञानाबद्दल आकर्षण व कुतुहल निर्माण केले. आर्थर शोपेनहर (१७८८-१८६०) या जर्मन तत्ववेत्ता या उपनिषद तत्वज्ञानाने प्रभावित झाला आणि त्यामुळे १९ व्या शतकामध्ये अनेक जर्मन व फ्रेंच प्रज्ञावंतांनी वेद उपनिषद व भारतीय दार्शनिक साहित्याच्या अभ्यासाला प्राधान्य दिले. येथे पुन्हा हा मुद्दा अधोरेखित करावासा वाटतो की, शतक कुठलेही असले तरी पाश्चात्यांना वारंवार प्रभावित केले, संशोधनाला प्रवृत्त केले ते भारताच्या उपनिषदामधील तत्वज्ञानानी.

विसाव्या शतकामध्ये आधुनिक विज्ञानाने मोठी क्रांती केली. नील्स बॉर (Niels Bohr), हायजेनबर्ग (Heisenberg), एर्विन श्रोडिंगर (Erwin Schrodinger) आणि जे. रॉबर्ट ऑपेनहायमर (J. Robert Oppenneimer) हे सर्व या आधुनिक विज्ञानाचे शिल्पकार. श्रोडिंगर यांनी पूजासिद्धांताचे मूलभूत समिकरण संख्यासूत्रबद्ध केले. त्यांना नोबेल पारितोषिकही मिळाले होते. १९२५ च्या आत बाहेर, My view on the world आणि Mind and matter ही दोन अभ्यासपूर्ण पुस्तके त्यांनी लिहिली. औपनिषदीक विचारांचा त्यांच्यावरील प्रभाव त्यांनी या पुस्तकांमधून स्पष्टपणे मांडला आहे. प्रत्येक भारतीयाने ही पुस्तके वाचायला हवी. अणुस्फोटाच्या संशोधनामध्ये ऑपेनहायमर यांचा सिंहाचा वाटा आहे. अणुस्फोटानंतर दिसलेल्या प्रकाशाचे वर्णन त्यानी गीतेमधील खालील श्लोकानी केले आहे.

दिवि सूर्यसहस्त्रस्य भवेद् युगपदुत्थिता।
यदि भाः सहशिसास्यात् भासस्तस्य महात्मना।।

भारतीय तत्वज्ञानाची किंमत आणि गरज ही बाजारी वस्तूंच्या किंमतीपेक्षा कितीतरी मौल्यवान आहे. भारतीय जीवनशैली, देवताशास्त्रापासून स्थापत्य शास्त्रापर्यंत सखोल संशोधन झालं असलं तरीही, शतकोन शतकं उपनिषद, आणि दार्शनिक तत्वज्ञानानी जगातील सर्व प्रज्ञावंतांना नवीन विचार करण्यास उद्युक्त केले आहे.

आज आपण आपल्या सणांपासून देवतांपर्यंत सर्वांच बाजारीकरण केलं आहे. दहीहंडी असो गणेशोत्सव असो किंवा दिवाळी असो त्यांचा ताबा आज राजकारण्यांनी घेवून त्याचे व्यावसायिकरण केले आहे. आज आपणच आपल्य तत्वज्ञानाला पारखे झालो आहोत. सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील दिवाळखोरीच याला जबाबदार आहे. भाविकांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या दानाची मोठमोठ्या मंदिरांमधून चालेली लूटमार लाजिरवाणीच नाही तर क्लेशकारक आहे. यातूनच चारित्र्यहीन, दिशाहीन, जडवादी समाज निर्माण होतो. त्याची प्रेरणास्थळंच नष्ट झाल्यावर सगळ्याच गोष्टींवरचा त्याचा विश्वास उडतो.

स्वयंघोषित, अतिउत्साही धर्मरक्षक, आणि धर्माची ढाल पुढे करून त्यामागे राजकारण करणाऱ्यांकडे धर्मरक्षणाची जबाबदारी सोपवणे धोक्याचेच नाही, तर आत्मघातकी ही आहे. पूजेपेक्षा यांचा डोळा वर्गणी आणि देणगीवर असतो. अशा तत्वांना वर्गणीच नाही, तर भावनीक पुरस्कारही देऊ नका. धर्म रक्षणाकरता त्यांचा प्रतिकार करा. आज खरी गरज आहे ती हा धोका ओळखून, आपल्या धर्माचे 'सनातन' तत्व जाणून घेण्याची. तेच खरे 'धर्म' रक्षण आहे.

•••


**वृत्तपत्र नोंदणी नियमाप्रमाणे (केंद्रीय) 'सद्धर्म' त्रैमासिकाच्या मालकीविषयी व इतर तपशिलासंबंधी माहितीचे निवेदन.**

**१. प्रकाशन स्थळ : लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे–४०० ६०१**
**२. प्रसिद्धीचा नियत काल : दर चौथ्या महिन्याच्या पहिल्या तारखेस.**
**३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : अनंत विनायक धोरे, भारतीय, पत्ता वरीलप्रमाणे.**
**४. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : वरीलप्रमाणे.**
**५. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : डॉ. विजय वासुदेव बेडेकर, भारतीय पत्ता वरील प्रमाणे.**
**६. एकूण भांडवलाच्या १ टक्क्याहून अधिक भांडवल घातलेल्या भागीदार व्यक्तीसह वृत्तपत्राच्या मालकांची नांवे : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट. पत्ता वरीलप्रमाणे.**
**मी अनंत विनायक धोरे, जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे बरोबर आहे.**

**सही – अनंत विनायक धोरे**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१